बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे





गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१४ गोंदिया | अंक ४७ | बुधवार,दि.२९ऑक्टोबर २०२५ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/104/2025-2027


## शेतकऱ्यांच्या मागण्यांना घेऊन निघालेल्या बच्चू कडूच्या मोर्च्याने नागपूरात वाहतूक कोंडी



**नागपूर :** शेतकऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी माजी आमदार बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखालील मोठा शेतकरी ट्रॅक्टर मोर्चा नागपूरकडे रवाना झाला आहे. बच्चू कडू स्वतः स्टीयरिंगवर असून त्यांनी शेतकऱ्यांसोबत ठाम निर्धार व्यक्त केला आहे की, कर्जमाफी मिळाल्याशिवाय मोर्चा माघार घेणार नाही.

हा मोर्चा आज सकाळपासून पूर्व दिशेने नागपूरकडे निघालेला असून सध्या बुटीबोरी परिसराजवळ पोहोचला आहे. काही तासांत तो नागपूर शहराच्या हद्दीत प्रवेश करणार असल्याने वाहतुकीवर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे. पोलीस प्रशासनाकडून नागपूरकरांना वाहतुकीबाबत सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

बच्चू कडू यांनी सांगितले की, शेतकऱ्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी संघर्ष सुरूच राहील आणि शासनाने सकारात्मक निर्णय घेतल्याशिवाय ते मागे हटणार नाहीत. शेतकऱ्यांना कर्जमुक्ती, शेतमालाला हमीभाव, दिव्यांगांना सहा हजार रुपये मानधन, मेंढपाळ आणि मच्छीमारांच्या न्याय्य हक्कांसाठी आज उपराजधानीत माजी आमदार बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली महाएल्गार आंदोलन आयोजित करण्यात आला आहे. शेतकरी मोठ्या संख्येने ट्रॅक्टर घेऊन सहभागी होणार आहेत.

आंदोलक रॅलीत हजारो ट्रॅक्टर, बैलगाड्या आणि मेंढपाळ बांधवांचा सहभाग आहे. आंदोलनासाठी अन्नसामुग्रीची मोठ्या प्रमाणात तयारी करण्यात आली आहे. सोलापूरहून २० हजार भाकऱ्या, मिरची आणि शेंगदाण्याचा खरडा, नाशिकहून कांदा व भाजीपाला, लातूरहून तूरडाळ, तसेच इतर भागांतून हुरडा व अन्नधान्य नागपूर शहराकडे रवाना झाले आहे.

राज्य शासनाकडून योग्य प्रतिसाद न मिळाल्याने हा ट्रॅक्टर मोर्चा मुख्यमंत्र्याचे शासकीय निवासस्थान रामगिरीकडे निघालेला आहे, अशी माहिती आंदोलकांनी दिली आहे.

गावोगावी चिवडा बनवण्याचे काम सुरू असून संपूर्ण ग्रामीण महाराष्ट्र या आंदोलनासाठी सज्ज असल्याचे सांगितले जात आहे. “शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करू’ अशी घोषणा देऊन सत्तेत आलेल्या सरकारने आजवर शेतकऱ्यांना दिलासा दिला नाही, असा आरोप आंदोलनकर्त्यांकडून करण्यात आला आहे. ना कर्जमाफी, ना हमीभाव- उलट केंद्र सरकारच्या चुकीच्या आयात-निर्यात धोरणामुळे शेतकरी आर्थिक संकटात आहे. कापसाची आयात वाढल्याने देशांतर्गत भाव घसरले, तर सोयाबीनचा किमान आधारभूत



भाव ५ हजार ३३५ रुपये असूनही शेतकऱ्यांना ५०० ते ३ हजार दरम्यानच विक्री करावी लागते, “हा कोणता आत्मनिर्भर भारत?’ असा सवाल शेतकऱ्यांकडून केला जात आहे.

### राज्यातील सर्व शेतकरी नेते एकत्र !

या आंदोलनाला राज्यातील प्रमुख शेतकरी नेत्यांचा पाठिंबा मिळाला आहे. आंदोलनाच्या मंचावर विजय जावंधिया, वामनराव चटप (स्वतंत्र भारत पक्ष), राजू शेट्टी (राष्ट्रीय अध्यक्ष, स्वामिनाथन शेतकरी संघटना), महादेव जानकर (राष्ट्रीय अध्यक्ष, राष्ट्रीय समाज पक्ष), डॉ. अजित नवले (अखिल भारतीय किसान सभा), राजन क्षीरसागर (अखिल भारतीय किसान सभा प्रगत मंच), प्रकाश पोहरे (अध्यक्ष, किसान ब्रिगेड), दीपकभाई केदार (ऑल इंडिया पँथर सेना), प्रशांत डिक्कर (स्वराज्य पक्ष), विठ्ठलराजे पवार (शरद जोशी विचार मंच, शेतकरी संघटना),अनिल देशमुख राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष,रविकांत तुपकर,महेंद्र भांडारकर एकत्र येणार आहेत.

## अवकाळी पावसाने १३९५५ हेक्टर क्षेत्र बाधित

**गोंदिया :-** गोंदिया जिल्ह्यात २४ ते २६ ऑक्टोबरदरम्यान झालेल्या जोरदार अवकाळी पावसामुळे खरिपातील धानपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. कृषी विभागाने केलेल्या प्राथमिक सर्वेक्षणात १४ हजार हेक्टरवरील धानपिकांचे नुकसान झाल्याचे पुढे आले असून पंचनामे पूर्ण झाल्यानंतर या आकड्यात वाढ होण्याची शक्यता कृषी विभागाने वर्तविली आहे.

जिल्ह्यात खरीप हंगामात १ लाख ९६ हजार हेक्टरवर धानपिकाची लागवड करण्यात आली होती. यात हलक्या धानाचे क्षेत्र सर्वाधिक आहे. सध्या जिल्ह्यात हलक्या धानाची कापणी आणि मळणी जोमात सुरू आहे. मात्र, याचदरम्यान २४ ते २६ ऑक्टोबरदरम्यान अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. परिणामी कापणी केलेल्या धानाच्या कडपा भिजल्या, तर शेतात पाणी साचल्याने कापणी केलेल्या धानाच्या कडपा रात्रभर पाण्यात पडून राहिल्याने धान सडले असून, त्याला कोंब फुटत आहे. जिल्ह्यातील एकूण ७८५ गावे बाधित असल्याचा अंदाज असून ३५५७८ शेतकऱ्यांचे नुकसान झालेले आहे तर १३९५५.४ हेक्टर क्षेत्राचे नुकसान झाले असल्याचा प्राथमिक नजरअंदाजित अहवाल आहे.

जिल्ह्यात दिनांक २५ व २६ ऑक्टोबर २०२५ रोजी गोंदिया जिल्ह्यातील अवकाळी पाऊस/वादळी वारे/गारपीट यामुळे शेतपिकांच्या झालेल्या नुकसानीचे प्राथमिक नजर अंदाजित अहवाल सादर झाला असून यामध्ये सर्वाधिक नुकसान गोंदिया तालुक्यातील असल्याचे निरीक्षण आहे.

जिल्ह्यातील शेतपिकांच्या झालेल्या नुकसानीचे प्राथमिक नजरअंदाजित अहवालानुसार गोंदिया तालुका- बाधीत गावे-१३७, अंदाजे बाधित क्षेत्र-७४२८.००, अंदाजे बाधित शेतकरी संख्या २००००, बाधित पिके- भात. गोरेगाव तालुका- बाधीत गावे-५२, अंदाजे बाधित क्षेत्र-८३१.००, अंदाजे बाधित शेतकरी संख्या १८९४, बाधित पिके- भात. तिरोडा तालुका- बाधीत गावे-११६, अंदाजे बाधित क्षेत्र-५५६.००, अंदाजे बाधित शेतकरी संख्या १३९०, बाधित पिके- भात. मोरगाव अर्जुनी तालुका- बाधीत गावे-१०८, अंदाजे बाधित क्षेत्र-४२३.४०, अंदाजे बाधित शेतकरी संख्या १०४०, बाधित पिके- भात. देवरी तालुका- बाधीत गावे-११७, अंदाजे बाधित क्षेत्र-१९३६.००, अंदाजे बाधित शेतकरी संख्या ४१०५, बाधित पिके- भात. आमगाव तालुका- बाधीत गावे-७२, अंदाजे बाधित क्षेत्र-८७०.००, अंदाजे बाधित शेतकरी संख्या १७२०, बाधित पिके- भात. सालेकसा तालुका- बाधीत गावे-८६, अंदाजे बाधित क्षेत्र-१२००.००, अंदाजे बाधित शेतकरी संख्या ३५६०, बाधित पिके- भात. सडक अर्जुनी तालुका- बाधीत गावे-९७, अंदाजे बाधित क्षेत्र-७११.००, अंदाजे बाधित शेतकरी संख्या १८६९, बाधित पिके- भात. सदर पीक नुकसानीचा अहवाल नजरअंदाजित आहे.



### आमदार अग्रवालांनी केली नुकसानग्रस्त पिकांची पाहणी

**अचानक आलेल्या प्रतिकूल हवामानामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. त्यांच्या भात पिकांची कापणीसाठी तयार होती, परंतु अचानक आलेल्या मुसळधार पावसामुळे मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे आमदार विनोद अग्रवाल यांच्यासह जिल्हा परिषद कृषी आणि पशुसंवर्धन अध्यक्षा दीपा चंद्रिकापुरे, भाजप किसान आघाडीचे जिल्हाध्यक्ष छत्रपाल तुरकर, उपविभागीय अधिकारी खंडाईत, तहसीलदार समशेर पठाण, गटविकास अधिकारी, जिल्हा सचिव चेतन बहेकर, लखन हरिणखेडे, जिल्हा परिषद सदस्य वैशालीताई पंधरे, तलाठी, सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत अधिकारी आणि इतरांनी शेतकऱ्यांच्या पिकांची पाहणी केली.**

### चार तालुक्यांना सर्वाधिक फटका

**कृषी विभागाच्या प्राथमिक सर्वेक्षणात गोंदिया, अर्जुनी मोरगाव, देवरी, तिरोडा या तालुक्यांतील धानपिकांचे अवकाळी पावसाने अधिक नुकसान झाल्याचे पुढे आहे. गोंदिया तालुक्यात ७५०० हेक्टर, अर्जुनी मोरगाव १ हजार हेक्टर, देवरी ३ हजार हेक्टर, तिरोडा २ हजार हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. या नुकसानीच्या आकड्यांत आणखी वाढ होण्याची शक्यता आहे**

## नि:शुल्क अनिवासी उद्योजकता विकास प्रशिक्षणासाठी आज निवड

गोंदिया : भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (इअठढख) पुणे व महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (चउएऊ) यांच्या संयुक्त विद्यमाने गोंदिया जिल्ह्यातील अनुसूचित जाती प्रवर्गाकरीता नि:शुल्क अनिवासी उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम दि. ३० ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर २०२५ या दरम्यान आयोजित करण्यात आलेला आहे. याची निवड उद्या बुधवारी दिनांक २९ ऑक्टोबर रोजी होणार आहे.या कार्यक्रम अंतर्गत उद्योजकीय व्यक्तिमत्व विकास, उद्योगसंधी मार्गदर्शन, उद्योगाची निवड, प्रकल्प अहवाल तयार करणे, बाजारपेठ पाहणी, उद्योगासंबंधित विविध नोंदणी व परवाने, उद्योगांना भेटी, शासनाच्या व महामंडळाच्या विविध कर्जयोजनांची माहिती, स्टार्ट अप इंडिया, मेक ईन इंडिया, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजना, प्रधानमंत्री रोजगार निर्मिती योजना, मुद्रा योजना तसेच उद्योग उभारणीच्या संदर्भात परिपूर्ण मार्गदर्शन केल्या जाईल.

## फेब्रुवारीमध्ये जागतिक स्तरावरील “मुंबई क्लायमेट वीक’चे मुंबईत आयोजन

**गोंदिया :** वातावरणीय बदल आणि पर्यावरण संवर्धनाच्या क्षेत्रात भारताचे नेतृत्व अधोरेखित करणारी मुंबई वातावरण सप्ताह – “मुंबई क्लायमेट वीक’ ही जागतिक स्तरावरील परिषद पुढच्या वर्षी फेब्रुवारीमध्ये मुंबईत होणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

हा महत्त्वाकांक्षी उपक्रम “प्रोजेक्ट मुंबई’ या संस्थेच्या संकल्पनेतून साकारला जात असून महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण आणि वातावरणीय बदल विभाग आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सहकार्याने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. मंत्रालयातील समिती कक्षात आयोजित बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस यांनी या उपक्रमाची घोषणा केली. यावेळी पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या मंत्री पंकजा मुंडे, महापालिका आयुक्त भूषण गगराणी, विभागाच्या सचिव जयश्री भोज, प्रोजेक्ट मुंबईचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी शिशिर जोशी आदी उपस्थित होते.

## ‘त्या’ दांडीबाज अधिकाऱ्यांवर कारवाई होणार-पालकमंत्री

**गोंदियाः-** गोरेगाव येथील तहसील कार्यालयातील तहसीलदारांसह नायब तहसीलदार व काही अधिकारी कार्यालयीन वेळेत गैरहजर असल्याचा प्रकार उघडकीस आला होता. यावेळी तहसीलदार रजेवर तर नायब तहसीलदारांबद्दल मात्र, कुणालाही काही माहिती नसल्याचे तेथील कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्षदर्शी पाहणीत सांगितले होते. या प्रकरणाची दखल थेट जिल्ह्याचे पालकमंत्री इंद्रनिल नाईक यांनी घेतली असून सोमवार २७ ऑक्टोबर रोजी गोंदिया जिल्ह्याच्या दौऱ्यावर असता त्यांनी ‘त्या’ दांडीबाज अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे संकेत माध्यमांशी बोलताना दिले. तर जिल्हाधिकाऱ्यांनीही चौकशी करणार असल्याचे सांगितले. त्यामुळे आता ‘त्या’ दांडीबाज अधिकाऱ्यांवर कारवाई होणार का? याकडे जिल्हावासीयांचे लक्ष लागले आहे.





शासनाकडून दिवाळी उत्सवाच्या २३ तारखेपर्यंत शासकीय सुट्ट्या दिल्यानंतर शुक्रवार २४ ऑक्टोबर रोजी सर्व शासकीय कार्यालय आपल्या नियमीत वेळेवर सुरू झाले. असे असताना गोरेगाव येथील तहसील कार्यालयातील काही नायब तहसीलदारांसह अनेक अधिकारी वरिष्ठांना कसलीच सुचना न देता कार्यालयात गैरहजर असल्याचे दिसून आले होते. प्रसंगी जिल्हाधिकारी यांना भ्रमणध्वनीवर याविषयी माहिती दिली असता त्यांनी तहसीलदार रजेवर असल्याचे सांगितले. मात्र, तहसीलदार रजेवर असले तरी त्यांच्या गैरहजेरीत नायब तहसीलदारांनी कार्यालयाची जबाबदारी पाहणे महत्वाचे होते. मात्र, २४ ऑक्टोबर रोजी दुपारपर्यंत एकही नायब तहसीलदार किंवा वरीष्ठ अधिकारी कार्यालयात उपस्थित नव्हते. त्यामुळे तहसील कार्यालयात विविध कामासाठी येणाऱ्या नागरिकांची चांगलीच फजिती होत अनेकांना आल्यापावली परतावे लाले होते.

दरम्यान, सोमवारी जिल्ह्याचे पालकमंत्री इंद्रनिल नाईक हे गोंदिया जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले असता त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी सदर प्रकाराची माहिती देत कारवाई होणार का अशी विचारणा केली असता त्यांनी अजीतदादा माझे नेते आहेत. त्यांचा मी चेला असून ते शिस्तबद्ध आहेत. ज्या जिल्ह्यात तुम्ही जाणार तिथे शिस्त लागलीच पाहिजे, असे निर्देश अजितदादांचे आहेत. आणि ती माझ्यासाठी नाही तर जे कोणी अधिकारी कर्मचारी असतील ते जनतेसाठी आहेत, याचं भान त्यांना असायला पाहिजे. आज, पहिला दिवस आहे. थोडं प्रेमाने आढावा घेतो पण शिस्त लावणार म्हणजे लावणार असा सुचक इशारा यावेळी पालकमंत्र्यांनी दिला. दरम्यान, जिल्हाधिकारी प्रजित नायर यांच्याशी याविषयी विचारणा केली असता त्यांनी याप्रकरणी निश्चितच चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यात येईल असे माध्यमांना सांगितले.

तहसील कार्यालयात कार्यरत अधिकारी, कर्मचाऱ्यांचा मनमर्जीपणा प्रसार माध्यमांनी चव्हाट्यावर आणले. त्यामुळे प्रशासनात चालले काय? असा प्रश्न निर्माण झाला. शुक्रवारी कार्यालय सुरू झाले मात्र अधिकारी, कर्मचारी नदारद होते. एवढेच नव्हेतर आठवड्याच्या पहिल्या दिवशी देखील सकाळी ११.३० वाजेपर्यंत अधिकारी कार्यालयात पोहचले नाही. त्यामुळे बेलगाम अधिकाऱ्यांवर नियंत्रण कुणाचे असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

जिल्हा मुख्यालयापासून अवघ्या १२ किमी. अंतरावरील गोरेगाव तालुक्यातील शासकीय कार्यालय म्हणजे कामचुकारपणा अंगीकारणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे सोयीस्कर कार्यालय ठरू लागले आहे. ही बाब प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींनी शुक्रवारी चव्हाट्यावर आणली. दिवाळी सणाच्या सुट्टीनंतर शासकीय कार्यालयांच्या कर्तव्याचा पहिला दिवस शुक्रवार होता. मात्र गोरेगाव तहसील कार्यालयात तहसीलदार प्रज्ञा भाकरे ह्या सुट्टीवर होत्या. तर चार नायब तहसीलदार कार्यालयातून नदारद होते. बोटावर मोजण्याएवढे स्थायी कर्मचारी होते.

दिवाळीच्या निमित्ताने राज्यसरकारी कर्मचार्यांना भाऊबिजेपर्यंत सुट्या शासनाने दिलेल्या होत्या.त्यानंतर २४ ऑक्टोबरपासून कार्यालयीन कामकाज सुरु झाले.मात्र काही अधिकारी कर्मचारी यांनी रजेचा अर्ज न घालतचा सुट्टी घेत कार्यालयाला बुट्टी मारल्याचा प्रकार बघावयास मिळाला.

जिल्ह्यातील गोरेगाव तहसिल कार्यालय तसे नेहमी चर्चेत असते, येथील तहसिलदार या गोरेगाव या मुख्यालयी न राहता त्या गोंदियावरुन ये-जा करतात. रजा न घेतलेले नायब तहसीलदार व प्रमुख विभागातील वरिष्ठ कर्मचारीही गैरहजर असल्याने कार्यालयातील खुर्च्या रिकाम्या दिसत होत्या.

## मराठा आरक्षणाचा जीआर ओबीसींसाठी घातक

**नागपूर :** राज्यात ओबीसी आरक्षणाच्या प्रश्नावरून वातावरण तापले असून, सरकार झुकण्यास तयार नसल्याची टीका काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. “ओबीसींचा मोर्चा निघून दोन आठवडे उलटले तरी राज्य सरकारने अद्याप कोणतीही ठोस कारवाई केलेली नाही. सरकारमधील काही चेले-चपाटे ओबीसींचे नुकसान होत नाही, असे सांगत आहेत; मात्र प्रत्यक्षात २ सप्टेंबर रोजी काढलेल्या शासन निर्णयामुळे ओबीसींचे मोठे नुकसान होत आहे,” असे वडेट्टीवार यांनी स्पष्ट केले.

वडेट्टीवार यांनी सांगितले की, “मराठा आरक्षणासंदर्भातील शासन निर्णय हा मराठवाड्यापुरता मर्यादित असल्याचे सांगितले जात असले, तरी त्या निर्णयानुसार मिळणारे प्रमाणपत्र हे फक्त चार जिल्ह्यांपुरते मर्यादित नसून संपूर्ण देशभर वैध राहते. त्यामुळे ओबीसी समाजाच्या आरक्षणावर त्याचा थेट परिणाम होणार आहे. या निर्णयामुळे समाजाची दिशाभूल करण्यात येत आहे.”

वडेट्टीवार यांनी भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावरही जोरदार टीका केली. ते म्हणाले, “बावनकुळे हे स्वतः ओबीसी समाजातून आलेले नेते आहेत. ओबीसींमुळेच त्यांना आज राजकीय पद मिळाले आहे. भाजपने एकेकाळी त्यांना अडगळीत टाकले होते. आता पुन्हा पद मिळाल्याने त्यांनी खुर्चीसाठी वाहत जाऊ नये. समाजाच्या हितासाठी त्यांनी ठाम भूमिका घ्यावी.” असेही वडेट्टीवार म्हणाले.



ओबीसी मोर्चानंतरही सरकारकडून प्रतिसाद न मिळाल्याने आता पुढील लढ्याची दिशा ठरवण्यासाठी १ नोव्हेंबर रोजी नागपुरात विदर्भातील आणि राज्यातील प्रमुख ओबीसी नेत्यांची बैठक घेण्यात येणार असल्याचे वडेट्टीवार यांनी सांगितले. “या बैठकीत शासन निर्णय रद्द करण्यासाठी कोणती रणनीती आखावी, पुढील आंदोलनाची रूपरेषा काय असावी, यावर सविस्तर चर्चा होईल. त्यानंतर आमची पुढील भूमिका सार्वजनिक केली जाईल,” असे त्यांनी नमूद केले.वडेट्टीवार यांनी स्पष्ट केले की, “आम्ही मराठा समाजाचे विरोधक नाही.

मराठा समाजालाही आरक्षण मिळाले पाहिजे, पण ते ओबीसींच्या वाट्यातून नको. आमच्या समाजाचा अधिकार कुणी हिरावून घेऊ नये.ङ्क राज्य सरकारने तात्काळ जीआर रद्द करून ओबीसींच्या आरक्षणावरील संभ्रम दूर करावा, अन्यथा मोठ्या आंदोलनाची चेतावणीही वडेट्टीवार यांनी दिली आहे.

### सेवानिवृत्त शिक्षक-शिक्षकेत्तर अधिकारी, कर्मचाऱ्यांचा इशारा

**गोंदिया :** शासन नियमानुसार नक्षलग्रस्त किंवा आदिवासीबहुल क्षेत्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना एकस्तर वेतन श्रेणीचा लाभ देण्याची तरतूद आहे. पण एकाच पदावर १२ वर्ष झाल्यानंतर त्या कर्मचाऱ्याला चटोपाध्याय वेतन श्रेणीचा लाभ दिल्यानंतर एकस्तर वेतनश्रेणीचा लाभ बंद करण्यात आले.पण १९ फेब्रुवारी २०२४ च्या जीआरप्रमाणे जो कर्मचारी नक्षलग्रस्त क्षेत्रात काम करीत असेल,त्या कर्मचाऱ्याला एकस्तर वेतनश्रेणीचा लाभ देण्यात यावे, असे शासन निर्णय आहे.परंतु, काही कर्मचाऱ्यांना अद्यापही एकस्तर वेतनश्रेणीचा लाभ मिळालेला नाही. या संदर्भात अनेकदा पाठपुरावा देखील करण्यात आला. परंतु दुर्लक्ष केले जात आहे. यामुळे लाभ द्या, अन्यथा प्रशासनाविरूध्द न्यायालयात दाद मागणार, असा इशारा सेवनिवृत्त कर्मचारी संघटनेने दिला आहे.

## नगराध्यक्षपदासाठी दावेदारी प्रभागांमध्येही भेटीगाठींचा पुढाऱ्यांचा वाढला जोर

**गोंदिया:-** सर्वत्र दिवाळीची लगबग दिसून येत असून, होऊ घातलेल्या नगर परिषद निवडणुकीचीही लगबग इच्छुकांमध्ये दिसू लागली आहे. नगराध्यक्ष व प्रभागांमधील आरक्षणाचे चित्र स्पष्ट झाल्यानंतर आता इच्छुकांकडून उमेदवारीसाठी धावपळ सुरू झाली आहे. नगराध्यक्षपद असो की प्रभाग मात्र दिवाळी शुभेच्छांच्या बॅनरच्या माध्यमातून प्रचाराची इच्छुकांनी प्रचाराला सुरूवात केल्याचे चित्र बघायला मिळत आहे. त्यांचा भेटीगाठींचाही जोर वाढला आहे.




नगर परिषदेच्या निवडणुकीसाठी इच्छुकांना प्रचंड लगीनघाई झाली असून, त्यांनी पक्षांकडून उमेदवारी जाहीर होण्यापूर्वीच स्वतः उमेदवारी घोषित आपणच नगराध्यक्षपदाचे उमेदवार असल्याचे सांगत शहरातील प्रभागांमध्ये प्रचाराला सुरुवात केली आहे. गोंदिया नगर परिषदेत यंदा एक प्रभाग वाढला असून, यंदा ४४ सदस्यांची निवड करायची आहे. तर मागील निवडणुकीत खुला प्रवर्गासाठी असलेले नगराध्यक्षपद यंदा ओबीसींच्या प्रवर्गासाठी आहे. या आरक्षणामुळे कित्येकांचा हिरमोड झाला असून, ते आता प्रभागांमध्ये आपली सेटिंग करताना दिसत आहेत. नगराध्यक्षपदासाठी पात्र ठरत असलेल्या तर इच्छुकांकडून आता उघडपणे दावेदारी केली जात आहे.

विशेष म्हणजे, या इच्छुकांना दिवाळीचा सण प्रचारासाठी आयता मिळाला असून, दिवाळी शुभेच्छांच्या आडून त्यांनी आपल्या प्रचाराला सुरुवात केली आहे. त्यामुळेच सध्या शहरात होर्डिंगबाजीला उधाण आल्याचे चित्र आहे. बघावे तेथे इच्छुकांचेच होर्डिंग झळकत असून, यामध्ये नगराध्यक्षपद ते प्रभागासाठीच्या इच्छुकांचा भरणा आहे. आपण रिंगणात उतरणार आहोत हे दाखवून देण्यासाठी त्यांनीही प्रभागात दिवाळीचे होर्डिंग लावून तयारीला सुरु करून टाकली आहे.

शहरात यंदा २२ प्रभागांमध्ये ४४ सदस्य निवडून द्यायचे आहेत. म्हणजेच, एका प्रभागात दोन सदस्य निवडायचे आहेत. यामुळे आता प्रभागात दमदार उमेदवारांची जोडी पक्षाला तयार करावी लागणार आहे. यामुळेच पक्षातील नेत्यांकडून अशा दमदार उमेदवारांचा शोध घेणे सुरू झाले आहे. तर इच्छुकांकडूनही आपली जोडी जमवून रिंगणात उतरण्यासाठी समीकरण तयार केले जात आहेत. यामुळे आता नेत्यांचेही टेन्शन वाढले आहे.

### निवडणुकीसाठी नवख्यांनाही पदाचा मोह

**इच्छुकांनी आपल्याकडून निवडणुकीत उतरण्यासाठी तयारी सुरू केली असली तरी आता तिकीट मिळिवण्यासाठी त्यांना जोर लावावा लागणार आहे. यामुळेच आता त्यांच्याकडून नेतेमंडळींशी संपर्क वाढविला जात आहे. आपण पक्षाशी किती इमानदारीने जुळलेले आहोत हे दाखवून दिले जात आहे. विशेष पदाधिकारीही उतरले असून, नवख्यांनाही पदाचा म्हणजे, यामध्ये पक्षातील आजी-माजी मोह आवरता येत नसल्याने कित्येक नवीन चेहरेही दिसत आहेत.**

### आमदारांच्या निर्णयाकडेच लागल्या इच्छुकांच्या नजरा

**गोंदिया जिल्ह्यात भाजपचे संघटन मजबूत होत चालले आहे. गोंदिया पालिकेच्या निवडणुकीची रणधुमाळी सध्या सुरू आहे. पक्षाकडून चेहऱ्यांची चाचपणी सुरू आहे.त्यामुळे जरी संघटना उमेदवारांची नावे निश्चित करणार असली तरी खऱ्या अर्थाने गोंदिया नगर पालिकेतीलआ. विनोद अग्रवाल यांची पसंती मिळाल्यानंतरच उमेदवार निश्चित होईल. त्यामुळे आमदारांकडे इच्छुकांनी गर्दी करणे सुरू केले. आमदार आणि पक्षाच्या सहमतीची सांगड बसल्यानंतरच निश्चित होणार आहेत.**

### आमगाव, फुलचूरचा तिढा कायम

**शासनाने पूर्वी आमगावला नगर पंचायतचा दर्जा दिला. त्यानंतर ८ गावे मिळून नगर पालिका तयार करण्यात आली. हा विषय न्यायालयात गेला. गत २ दोन महिन्यांपूर्वीच ७ गावांना ग्राम पंचायतचा दर्जा देवून आमगावला नगर पंचायतचा दर्जा बहाल करण्यात आला. मात्र अद्यापही तेथील निवडणूक जाहीर झाली नाही. दुसरीकडे राज्य शासनाने फुलचूर आणि फुलचूरपेठ या २ ग्रामपंचायती मिळून नगर पंचायतला मंजुरी दिली. परंतु, निवडणूक कार्यक्रमात येथील निवडणूक जाहीर केलेली नाही. त्यामुळे दोन्ही ठिकाणचा तिढा अद्याप कायम आहे.**

## संपादकीय

### फलटण प्रकरणात व्यवस्थेची लक्तरे वेशीवर

सातारा जिल्ह्यातील फलटण शहरात घडलेल्या एका महिला डॉक्टरच्या आत्महत्येने महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक वातावरणात भूकंपासारखी खळबळ उडवली आहे. २४ ऑक्टोबर रोजी फलटण उपजिल्हा रुग्णालयात कार्यरत असलेल्या २८ वर्षीय डॉ. संपदा मुंडे यांनी गळफास घेऊन जीवनाचा अंत केला. मात्र, ही घटना केवळ एका तरुण डॉक्टरच्या दुर्दैवी मृत्यूपुरती मर्यादित राहिलेली नाही, तर त्याने संपूर्ण प्रशासकीय व्यवस्थेच्या कारभारावर बोट ठेवले आहे.त्यातच याप्रकरणात महिला आयोगाच्या अध्यक्षानी घेतलेली पत्रकार परिषदेकडे बघितल्यास महिला आयोग त्या महिलेला न्याय मिळवून देण्याच्या उद्देशाने नसून आरोपीना वाचविण्याकरीताच घेतल्याचे अभ्यासाअंती दिसून येत आहे.त्यामुळे महिला आयोगाच्या कार्यक्षमतेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहेत.याप्रकरणात ज्यापध्दतीने मुख्यमंत्र्यांनी दिलेली क्लीनचिट आणि निबांळकरांना सावरण्याची बाजू म्हणजे महिलेवरच अन्याय करण्यासारखी घटना या पत्रपरिषदेत झाल्याचे दिसून येत आहे.

डॉ.मुंडे यांच्या हाताच्या तळव्यावर लिहिलेल्या थरकाप उडवणाऱ्या नोटमध्ये फलटण पोलीस ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षक गोपाळ बदने यांनी चार वेळा बलात्कार केल्याचा आणि त्यांच्या घरमालकाचा मुलगा प्रशांत बनकर याने सतत मानसिक छळ केल्याचा थेट आरोप आहे. ही घटना केवळ वैयक्तिक अन्यायाची नाही, तर ती एका सडलेल्या व्यवस्थेचे प्रतिबिंब आहे. ज्यात राजकीय नेते, पोलीस आणि सरकारी यंत्रणा यांचे संगनमत असल्याचा संशय निर्माण झाला आहे. फलटण येथील उपजिल्हा रुग्णालय हे स्थानिक लोकांसाठी आरोग्यसेवेचे प्रमुख केंद्र आहे. डॉ. संपदा मुंडे या तरुण डॉक्टर होत्या, ज्या ग्रामीण भागातील रुग्णसेवेसाठी समर्पित होत्या. मात्र, त्यांच्या जीवनात अचानक काळोख अवतरला, जेव्हा त्यांना पीएसआय गोपाळ बदने यांच्याकडून शारीरिक शोषणाला सामोरे जावे लागले. तक्रारीनुसार, बदने याने डॉक्टरांच्या मोबाईलमधील चॅट्स आणि मेसेजेसद्वारे त्यांच्यावर दबाव टाकला आणि अनेकदा बलात्कार केला. याशिवाय, प्रशांत बनकर हा डॉक्टरांच्या घरमालकाचा मुलगा असून, त्याने सतत मानसिक त्रास देऊन त्यांना त्रस्त केले. या दोघांच्या अन्यायाला कंटाळून डॉ. संपदा मुंडे यांनी हाताच्या तळव्यावर मबदने-बलात्कार, बनकर-छळफ असे लिहून आत्महत्या केली. ही नोट पाहिल्यावर पोलिसांनी प्रथमदर्शनी गुन्हा नोंदवला, पण त्यानंतरची कारवाई मात्र संशयास्पद ठरली.

घटनेच्या दुसऱ्या दिवशी पोलिसांनी प्राथमिक तपास केला, पण आरोपी बदने याला ताबडतोब अटक करण्याऐवजी वेळ देण्याचा प्रयत्न केला. बदने फलटण पोलीस ठाण्यातील अधिकारी, ज्याच्याकडे स्थानिक राजकारण्याशी जवळीक असल्याचे बोलले जाते. येथे आणखी एक वळण येते ते म्हणजे भाजपचे खासदार रणजीतसिंह नाईक निंबाळकर. यांच्यावरही या प्रकरणात दबाव टाकल्याचा आरोप आहे. अंबादास दानवे यांनी ट्विटरवर पुराव्यासह आरोप केले की, नाईक निंबाळकर यांनी डॉक्टरांवर शवविच्छेदन अहवाल बदलण्यासाठी दबाव टाकला. दानवे यांच्या म्हणण्यानुसार, खासदारांनी पोलिसांना फोन करून तक्रार दाबण्याचा प्रयत्न केला आणि बदने यांना वाचवण्यासाठी हस्तक्षेप केला. हे आरोप खरे असतील तर हे प्रकरण केवळ बलात्कारापुरते मर्यादित राहणार नाही, तर ते राजकीय संरक्षण आणि प्रशासकीय भ्रष्टाचाराचे प्रकरण ठरेल. नाईक निंबाळकर यांचा स्थानिक पोलिसांवर प्रभाव असल्याचे स्थानिकांकडून सांगितले जाते. या प्रकरणात सरकारी अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष स्पष्टपणे दिसून येते. प्रथम, डॉ. मुंडे यांच्या आत्महत्येनंतर पोलिसांनी तत्काळ शवविच्छेदन केले नाही. उलट, दोन दिवस रखडले आणि त्यात राजकीय दबावाचा संशय निर्माण झाला. सातारा जिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी आणि जिल्हा प्रशासनानेही या प्रकरणाकडे दुर्लक्ष केले. जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक यांनी तातडीने स्वतंत्र तपासाची घोषणा केली नाही, ज्यामुळे जनतेच्या मनात संशय वाढला. बदने याला निलंबित करण्यात आले, पण तो पाच दिवसांनी स्वतः हजर झाला आणि कोठडीत गेला. प्रशांत बनकर यालाही पुण्यातून अटक करण्यात आली, पण हे सर्व उशिरा झाले. यातून दिसते की, पोलीस यंत्रणा आरोपींना वाचवण्याचा प्रयत्न करत होती.

मोबाईल चॅट्समधून धक्कादायक माहिती समोर आली. सुरुवातीला पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न झाला असल्याचा आरोप आहे. हे प्रकरण केवळ फलटणपुरते मर्यादित नाही, तर ते महाराष्ट्रातील आरोग्यसेवा आणि पोलीस यंत्रणेच्या सध्याच्या स्थितीचे प्रतिबिंब आहे. ग्रामीण भागात डॉक्टरांना सुरक्षित वातावरण नसते, हे वारंवार घडणाऱ्या घटनांमधून दिसते.

डॉ. मुंडेसारख्या तरुण डॉक्टरांना शारीरिक आणि मानसिक छळ सहन करावा लागतो आणि त्यांना न्याय मिळण्याऐवजी दबावाखाली काम करण्यास भाग पाडले जाते. यात राजकीय नेत्यांचा हस्तक्षेप असल्यास, तर लोकशाहीची मुळे हादरून जातात. फलटण प्रकरणाने ममी टूफ किंवा मडॉ. पायल तडवीफसारख्या घटनांची आठवण करून दिली आहे, ज्यात महिलांवर होणाऱ्या अत्याचारांना व्यवस्थेचा पाठिंबा मिळतो. सध्या या प्रकरणाची सीबीआय किंवा स्वतंत्र तपासाची मागणी होत आहे, जेणेकरून राजकीय दबावापासून मुक्त राहील. या घटनेने सामाजिक कार्यकर्ते, महिला संघटना आणि स्थानिक नागरिक रस्त्यावर उतरले आहेत. फलटणमध्ये मोर्चे काढले गेले आणि मुंबईसह पुण्यातही निदर्शने झाली.

जनतेतून आवाज उठतोय की, अशा प्रकरणात न्याय मिळणे आवश्यक आहे. मात्र, सरकारी अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष येथे सर्वाधिक दिसून येते. पोलीस अधिकाऱ्यांनी तक्रार नोंदवली नाही, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी पुरावा जपला नाही आणि प्रशासकीय यंत्रणाने राजकीय दबावापुढे मान झुकवली. अशा प्रकारे दुर्लक्ष करणे म्हणजे केवळ निष्काळजीपणा नाही, तर ते अपराधाचा भाग आहे. जनमानसातून आता एकच मागणी आहे, ती म्हणजे या प्रकरणात केवळ आरोपींना शिक्षा होण्यापुरती मर्यादित राहू नये, तर सरकारी अधिकाऱ्यांना निलंबनही पुरेसे नाही. त्यांना सेवेतून बडतर्फ करून कठोर कारवाई करावी. पीएसआय गोपाळ बदने, प्रशांत बनकर आणि राजकीय नेत्यांसह सर्व जबाबदार व्यक्तींना कायद्याच्या कचाट्यातून सुटका मिळू नये. शासनाने या प्रकरणात आरोपींना गंभीर शिक्षा होईल अशी कारवाई करावी, जेणेकरून भविष्यात अशा घटना घडणार नाहीत. अन्यथा व्यवस्थेची लक्तरे वेशीवर येऊनही लोकांचा विश्वास संपेल आणि महाराष्ट्राच्या प्रतिमेला धक्का लागेल.

## शहरात कचऱ्याचे ढीग, स्वच्छता यंत्रणा कुचकामी



**गोंदिया:-** दिवाळीच्या धामधूमीत नगरपरिषद अधिकारी व कर्मचाऱ्यांचे शहर स्वच्छतेकडे दुर्लक्ष होत आहे. शहरातील प्रत्येक प्रभागात जागोजागी कचरा विखुरला आहे. कचऱ्याच्या ढिगाऱ्यांतून दुर्गंधी येत आहे. त्यामुळे शहरवासीयांचे आरोग्य धोक्यात आले आहे. शहराच्या स्वच्छतेची मागणी शहरवासीयांनी केली आहे.

स्वच्छता असेल जिथे, आरोग्य नांदेल तिथे हा नारा लावला जात आहे. शासन-प्रशासन स्वच्छता ठेवण्यासाठी सर्वांना आवाहन करीत आहे. परंतु, दिव्याखाली अंधार या म्हणीप्रमाणे नगर परिषद प्रशासनाचे स्वच्छतेकडे लक्ष नसल्याचे दिसून येत आहे. दीड लाख लोकसंख्येचा टप्पा पार करणाऱ्या गोंदिया शहरात सद्यःस्थितीत सर्व प्रभागांमध्ये कचरा विखुरलेला आहे.

कचरापेट्या तुडुंब भरल्या असून बहुतांश कचरापेट्या जीर्ण झाल्या आहेत. वाऱ्यामुळे विखुरलेला कचरा नागरिकांच्या घरांमध्ये शिरत आहे. परिणामी, शहरवासीयांना आजारांची लागण होण्याची शक्यता आहे. पालिका प्रशासनाने लक्ष देऊन शहराच्या स्वच्छतेची मागणी नगरवासीयांनी केली आहे

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

## आ.बडोले यांचे संगीत क्षेत्रात आगमन;डिव्हाइन सरेंडर गाण्याचे मुंबईत प्रक्षेपण

**गोंदिया:-** संगीत, जागरूकता व आध्यात्मिकतेची सांगड घालणारे माजी मंत्री तथा आ. राजकुमार बडोले यांनी लिहिलेल्या मडिव्हाईन सरेंडर-द बुद्धिस्ट अॅन्थम ऑफ पिस, अवेकनिंग अॅण्ड कम्पॅशनफ हे गीत मुंबई येथील चर्चगेटमधील डाऊनटाऊन २० सभागृहात आयोजित कार्यक्रमात प्रक्षेपित करण्यात आले.

आ. राजकुमार बडोले यांनी लिहिलेल्या या गीतामध्ये बौद्ध तत्त्वज्ञानाच्या केंद्रस्थानी असलेली शांतता, आत्मबोध आणि करुणा या मूल्यांचा संदेश अंतर्भूत आहे. या गीतामध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर ख्याती मिळिवणारे अभिनेते गगन मलिक यांनी प्रतीकात्मक भूमिका साकारली आहे. तर सुप्रसिद्ध संगीतकार पावा यांनी हे गीत संगीतबद्ध केले आहे. या आध्यात्मिक निर्मितीमध्ये दिग्दर्शक निराज प्रभाकर यांनी आपल्या कलेची भर घातली आहे. तर अनिकेत बडोले यांनी या गीताची निर्मिती केली आहे. हे गीत थाई, व्हिएतनामी, श्रीलंकन, कंबोडियन, बांगलादेशी अशा अनेक भाषांमध्येही प्रक्षेपित करण्यात येणार आहे.

बँकॉकमधील स्टुडिओ २८ मध्ये हे गीत रेकॉर्ड करण्यात आले. बुद्धांची शाश्वत शिकवण संगीतासारख्या वैश्विक भाषेतून

सादर करत विविध संस्कृतींना जोडणारा कलात्मक सेतू म्हणून या गीताची निर्मिती करण्यात आली आहे. या गीताच्या प्रक्षेपण सोहळ्याला रॉयल थाई कॉन्स्युलेट मुंबईचे कॉन्सुल-जनरल डॉनाविट पूल्सवात,



राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, श्रीलंकेच्या कॉन्सुल जनरल शिराणी अरियारत्ने, महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे, कौशल्या विक्रमसिंघे, थायलंडचे उद्योजक तथा संशोधक कॅप्टन नट्टाकिट चायचलेर्ममोंग्खोन, संगीतकार व गायक पावा, अभिनेते गगन मलिक आणि दिग्दर्शक निराज प्रभाकर उपस्थित होते.

संस्कृती आणि सर्जनशीलतेची जाण असलेले कलाकार राजकारणातही आहेत, अशा शब्दात वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांनी कौतुक केले. डॉनाविट पूल्सवात म्हणाले, भगवान बुद्धांच्या सामायिक ज्ञानाने जोडल्या गेलेल्या थायलंड आणि भारत या दोन देशांमध्ये नाते निर्माण करणाऱ्या या उपक्रमाचा अनुभव घेणे आनंददायी आहे.

राजकुमार बडोले म्हणाले, हे केवळ एक गीत नाही, तर जागतिक ऐक्यासाठीची एक प्रार्थना आहे. आपल्या अंतर्मनातील दैवी सत्यासमोर केलेले समर्पण आहे. हे गीत भारत व जगातील करुणेचा सेतू बनले आहे. याप्रसंगी पावा व गगन मलिक यांनीही या माध्यमातून शांतता आणि जागृतीचा संदेश पुढे नेण्याची संधी मिळाल्याचा आनंद आणि कृतज्ञता वाटत असल्याचे मनोगत व्यक्त केले.

गगन मलिक म्हणाले, ङ्गआज जग ज्या टप्प्यातून जात आहे, त्या पार्श्वभूमीवर शांततेची गरज पूर्वीपेक्षा अधिक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दूरदृष्टी असलेले महान विचारवंत होते. करुणा आणि समता या मूल्यांमुळेच मानवजातीला योग्य मार्ग सापडू शकतो, हे त्यांना खूप आधीच समजले होते. ङ्गडिव्हाइन सरेंडरफ्च्या माध्यमातून शांतता आणि जागृतीचा संदेश पुढे नेण्याची संधी मिळाल्याचा मला मनापासून आनंद आणि कृतज्ञता वाटते.

या कार्यक्रमामध्ये संस्कृती, कला आणि अध्यात्माचा प्रेरणादायी संगम अनुभवायला मिळाला. शांतता आणि जागृतीचा संदेश देणाऱ्या या गीताच्या उत्सवानिमित्त अनेक मान्यवर, भिक्खू, कलाकार आणि सृजनशील क्षेत्रातील व्यक्ती एका छताखाली एकत्र आले. हे वातावरण अत्यंत शांत व चिंतनास उद्युक्त करणारे होते.

## बळीप्रतिपदेच्या निमित्ताने बळीराजा महोत्सव उत्साहात

**गोंदिया :-** दरवर्षी शहरातील सर्व सकल ओबीसी व बहुजन संघटनाच्यावतीने (दि.२२) ङ्गबळीराजा महोत्सवफ्बलिप्रतिपदेच्या निमित्ताने येथील जयस्तंभ चौकातील ओबीसी संघटनेच्या कार्यालयात साजरा करण्यात आला. कष्टकऱ्यांच्या सन्मानार्थ बळीराजा गौरव दिन घराघरांत साजरा व्हावा. यासाठी शेतकरी, परिवर्तनवादी, संविधान प्रेमी नागरीकांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन परिवर्तनवादी विचारकांनी यावेळी केले.

कार्यक्रमाला ओबीसी अधिकार मंचचे सयोंजक खेमेंद्र कटरे,कैलास भेलावे,ओबीसी संघर्ष कृती समितीचे शिशिर कटरे,एस.यु.वंजारी,प्रसिध्दी प्रमुख सावन डोये, संविधान मैत्री संघाचे अतुल सतदेवे,सामाजिक कार्यकर्ते भुपेंद्र वैद्य,बहुजन युवा मंचचे सुनिल भोंगाडे, रवी भांडारकर, भारतीय पिछडा शोषित संघटनेचे प्रेम



साठवणे,देवचंद खोब्रागडे,श्री.चौरागडे,दुर्गेश येल्ले,क्रिश साठवणे,महेंद्र बिसेन,भागचंद रहागंडाले,संजीव रहागंडाले,गौरव बिसने,प्रमोद गुडधे,जिवन शरणागत,नरेश परिहार,उमेश कटरे,पप्पू पटले,देवचंद बिसेन, प्राची साठवणे यांच्यासह ओबीसी बहुजन संघटनाचे पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.

बलिप्रतिपदा म्हणजे बळीराजाचे स्मरण करण्याचा सण. भारतीय संस्कृतीत बळीराजा न्यायी, दानशूर,सद्गुणी म्हणून विख्यात आहे.बळीचे राज्य अर्थात समतेचे,न्यायाचे राज्य. बळीचे राज्य म्हणजे स्त्रीपुरुष विषमता, जातीभेद, वर्णभेद रहित राज्य. अशा महादानशूर, संविभागी बळीराजाची आठवण दिवाळीला- बलिप्रतिपदेला बळीराजाचे वारस, शेतकरी आयाबहिणी इडापीडा जावो। बळीचे राज्य येवो।। असे म्हणत सण साजरा केला जात असल्याची माहिती उपस्थित पाहुण्यांनी यावेळी दिली.

## शेतकऱ्यांसाठी बेलर यंत्र शंभर टक्के अनुदानावर देण्याची मागणी

**गोंदिया:-** जिल्ह्यातील धान उत्पादक शेतकरी व पशुपालकांच्या अडचणीचा विचार करून ङ्गबेलर यंत्रङ्ग शंभर टक्के अनुदानावर देण्यात यावे, अशी मागणी पालकमंत्री इंद्रनिल नाईक यांच्याकडे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे करण्यात आली आहे.

जिल्हा हा मुख्यत्वेकरून धान उत्पादक जिल्हा असून शेतकरी धान काढणीनंतर उरणाऱ्या तणसावर पशुपालन करत असतात. परंतु सध्या बहुतांश शेतकरी कंबाईन हार्वेस्टरच्या माध्यमातून कापणी व मळणी करत असल्याने तणस गोळा करणे अशक्य झाले आहे. त्यामुळे पशुपालकांना चाऱ्याची तीव्र टंचाई भासत असून, दूध उत्पादनावरही परिणाम होत आहे.

सदर समस्या सोडविण्यासाठी शेतकरी उत्पादक कंपन्यांना ङ्गबेलर यंत्रङ्ग हे शंभर टक्के



अनुदानावर देण्यात यावे, अशी मागणी निवेदनात करण्यात आली. या यंत्रांमुळे शेतातील तणस गोळा करून साठवण करता येईल, चाऱ्याचा स्थिर पुरवठा होईल, तसेच शेतातील अवशेष जाळण्याचे प्रमाण कमी होऊन पर्यावरण संवर्धनास हातभार लागेल, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

यावेळी अर्जुनी मोरगाव तालुका अध्यक्ष लोकपाल गहाणे,ओबीसी आघाडी जिल्हा अध्यक्ष किशोर तरोणे,महिला तालुका अध्यक्ष शिशुलाताई हलमारे उपस्थित होते.

## बेटर गोंदिया मित्रअॅप नागरिक, प्रशासन आणि जनप्रतिनिधींसाठी सेतुचे काम करणार- जिल्हाधिकारी प्रजित नायर

**गोंदिया :-** लोकशाहीमध्ये जनतेला प्राधान्य देऊन प्रशासन व जनप्रतिनिधी यांनी जनतेच्या विविध समस्या प्राथमिकतेने मार्गी लावणे आवश्यक असते. नागरिक, प्रशासन व जनप्रतिनिधी यांच्यामधील दुवा साधण्याचे कार्य "बेटर गोंदिया मित्र' अॅपद्वारे होणार, असा विश्वास आज अॅपच्या लाँचच्या वेळी जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी व्यक्त केला.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन भवनात "बेटर गोंदिया मित्र' अॅपचे जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते अनावरण करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमात अपर जिल्हाधिकारी मिनाज मुल्ला, पोलीस निरीक्षक नंदिनी चानपुरकर, बेटर गोंदिया संस्थेचे पदाधिकारी डॉ.विकास जैन व दिलीप जैन मंचावर उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. नायर म्हणाले, लोकांच्या प्रशासन व जनप्रतिनिधी यांच्या संबंधित विविध समस्या सोडविण्यासाठी हा अॅप तयार करण्यात आलेला आहे. त्याची उपयुक्तता नागरिकांना होणार आहे. सदर अॅप व्हॉट्सअॅपच्या माध्यमातून जनतेला वापरता येणार असून या एप्लीकेशनचे फीचर्स समजण्यासाठी फार सोपे आहेत. याचा वापर सर्व वयोगटातील नागरिकांना सहजपणे करता येईल. नागरिकांना त्यांच्या समस्याचे निराकरण "बेटर गोंदिया मित्र' अॅप माध्यमातून करता येऊ शकेल, असेही श्री. नायर यावेळी म्हणाले.





सदर अॅप तयार करण्यासाठी बेटर गोंदिया संस्थेचे मोठे योगदान आहे. या अॅपद्वारे नागरिकांच्या समस्या सोडविण्यास मदत होणार आहे. जिल्ह्यातील नागरिकांच्या समस्यांची सदर अॅपद्वारे प्रशासनामार्फत दखल घेऊन त्यांच्या समस्यांचे निरसन करण्यात येईल. सदर अॅपचा जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घेवून आपल्या समस्यांचे निराकरण करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी यावेळी केले.

"बेटर गोंदिया मित्र' अॅपचा वापर सर्वसामान्य जनतेनी कसा करावा याबद्दल संगणकीय सादरीकरणारे बेटर गोंदिया संस्थेचे पदाधिकारी तरुण मनुजा यांनी विस्तृतपणे उपस्थितांना माहिती दिली. जिल्ह्यातील प्रत्येक नागरिकांनी गोंदियाला चांगले (इशींशी) बनविण्यासाठी आपले अमूल्य योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

यावेळी जिल्ह्यातील नागरिकांना त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी ७८७५४४१६०१ या व्हॉट्सअॅप क्रमांकासह क्यू आर (ठठ) कोडचे मान्यवरांच्या उपस्थितीत विमोचन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.विकास जैन यांनी केले. सुत्रसंचालन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी राजन चौबे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार बेटर गोंदिया संस्थेचे पदाधिकारी अपूर्व मेठी यांनी मानले. कार्यक्रमास जिल्हाधिकारी कार्यालयाचे अधीक्षक धनंजय देशमुख, सहायक अधीक्षक संजय धार्मिक, बेटर गोंदिया संस्थेचे पदाधिकारी शैलेश अग्रवाल, आशिष चौहान, सावन बहेकार, विपलव जयसवाल, राहुल लालवानी, शिवम बोरकर, करण डोडवानी, आदित्य पांडे, पंकज भोजवानी, पियुष जैन, संकल्प ढेकवार, मनिष डोडानी, प्रेम चांदवानी, प्रियल रामानी, हर्षवर्धन खटवानी, धीरज मानवानी, क्रिश गलानी, मनिष जेठानी, शुभ डोडवानी, मानसी खटवानी, जिया अनवानी, अरुण गौतम, रोशनी डोडानी, काजल कोडवानी, डॉ.सोनिया हॉटचंदानी, विवेक गौतम, जयदिप जस्सानी, अजय शामका, राम लालवानी यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयाचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## स्त्रिया भयमुक्त व भटमुक्त व्हाव्यात म्हणून स्त्रीशिक्षणासाठी रान केले जीवाचे...

गुरुकुल शिक्षण पद्धतीत शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण झाले नव्हते तर स्त्रीशूद्रातिशूद्र ज्ञानव्यवहारापासून दूर ठेवण्यात आला होता. गुरू शिवाय शिक्षण नाही. गुरू आणि शिष्याची जात एकच असली पाहिजे अपवादात्मक क्षत्रिय चालत असे. शिक्षणावर गुरुचीच मालकी. गुरुशिवाय शिकणे म्हणजे घोर अपराध.एकलव्य अपराधी ठरला. एकलव्याचा अंगठा कापला गेला. शंबुकाला प्राणास मुकावे लागले. कर्णाचं काय झालं? स्त्रियांनी, शूद्रातिशूद्र यानी शिकणे म्हणजे धर्म बुडविणे. इच्छा असूनही आडूनदडून ज्ञान ग्रहण करण्याचा प्रयत्न केला तरी कानात शिसे ओतण्यासारखी भयंकर शिक्षा. मनुस्मृतीने कळस करुन ठेवला. म्हणून स्त्रीशूद्रातिशूद्र समाज हजारो वर्षे, पिढ्यानपिढ्या शिक्षणप्रवाहापासून दूर राहीला. समाज सुशिक्षित झाल्याशिवाय राष्ट्र बलशाली होणार नाही. शिक्षणाचा प्रसार प्रचार होऊन हजारो वर्षे शिक्षणापासून वंचित ठेवण्यात आलेले स्त्रीशूद्रातिशूद्रांना शिक्षण घेण्याची संधी मिळावी म्हणून महात्मा फुले मशिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचीफ आग्रही मागणी करताना मोफत व सक्तीचे शिक्षणासाठी कायद्याची मागणी करतात. तर शाहू महाराज ममोफत व सक्तीच्याफ शिक्षणाचा आदेश काढून शाळेत मुलं न धाडल्यास दंड आकारतात.कर्मवीर भाऊराव पाटील अहोरात्र झटून झोपडीतील काळोखापर्यंत ज्ञानजोत पोहचवतात. बाबासाहेब आंबेडकर ङ्गशिक्षणाने माणूस अन्यायाविरुद्ध बोलायला लागेल, ङ्गअसं दुर्दम्य आशावादी भाकित करतात. भारतीय संविधानानुसार शिक्षण मोफत व सक्तीचे केले असून मुलींना आणि मागास विद्यार्थ्यांना प्रोत्साहन पर भत्ता देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. त्यामुळे आज मुली मुलांच्या बरोबर किंबहुना मुलांपेक्षा सरस बऱ्याच क्षेत्रात गरुडझेप घेत आहे. आणि त्यामुळे ज्ञानव्यवहारात प्राबल्यासह अर्थार्जनाची साधनही प्राप्त झाली असल्याने निर्णय क्षमता स्वातंत्र्य आणि समतेच्या व्यवहारातही शिक्षणाचे महत्त्व दिसून येते.

परंतु शिक्षित झालेल्या लोकांमध्ये मोठ्या प्रमाणात जागृती येत असताना स्त्रीशूद्रातिशूद्राच्या शिक्षणासाठी ज्या महामानवांनी अथांग परिश्रम घेतले, त्यांच्या कर्तृत्वावर फुली मारुन ङ्गमुलांना आईवडील शिकवतातङ्ग असे सांगून शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी ज्यांनी जातीवादी उच्च जातीय धेंडापासून सनातन्यांच्या कुत्सित मानसिकतेचा मुकाबला केला, त्यांनाच बदनाम केले जाते. समाजासाठी काम करताना मफ्कुटुंबाकडे लक्ष दिले नाही.ङ्ग ङ्गमुलाबाळांची आबाळ केली.ङ्ग असा भ्रम अलगदपणे पसरवण्यात येतो. महात्मा फुले यांच्या बाबतीत तर उच्च जातीय मानसिकता प्रचंड आकसपूर्ण आहे. ९० च्या काळात सोबत प्रकरणात महात्मा फुले यांची प्रचंड बदनामी करणारे आठवतात का? ङ्गहा कसला महात्मा, ही तर फुले नावाची दुर्गंधीङ्ग सामाजिक क्रांतीच्या अग्रदूताची अशाप्रकारे केलेली अवहेलना आजही जिव्हारी लागते. नंतर सोबत प्रकरणात महाराष्ट्र पेटून उठला. स्त्रिया शिकून भयमुक्त झाल्या पाहिजे भटपुरोहिताच्या मतलबी धर्माच्या बुरख्याआडून होणाऱ्या शोषणातून मुक्त व्हाव्यात म्हणून स्त्रीशिक्षणासाठी अक्षरशः जिवाचे रान केले त्या महात्मा फुलेंची बदनामी करुन सर्वसामान्य लोकांच्या मनात गैरसमज पसरवून परिवर्तनवादी कार्याचे विरोधक अलगद तयार करण्याचे हे फंडे काही नवे नाहीच.


लोकजागृतीतून शिक्षणाचे महत्त्व समजू लागले. त्यामुळे आईवडील मुलांना शिक्षण देतात हे खरंय. मुलाबाळांचे भवितव्य उत्तम घडले पाहिजे ही त्यांची मनीषा समजूतदारपणाचीच होय. पण या महामानवांनी स्त्रियांसाठी,ओबीसी दलित आदिवासींसाठी धर्ममार्तंडाशी झगडून शिक्षणाची दारं उघडली नसती तर आपण कसे शिकू शकलो असतो? आपल्या पूर्वजांनी शिक्षण का घेतले नाही? शिक्षण घेणे म्हणजे धर्म बुडविणे, पाप, धर्मविरोधी असे सांगून शिक्षणापासून दूर ठेवले. मुलींना शिक्षण दिले तर त्या बिघडतील, बाहेरख्याली होतील असे अकलेचे तारे तोडले. आणि भारतात मुलींची पहीली शाळा जेव्हा सुरू केली तेव्हा कांगावा करणारे तेच होते ज्यांनी मतलबी धर्मग्रंथातून चातुर्वर्ण धर्माआधारे स्त्रीशूद्रातिशूद्रांना शिक्षण नाकारले. स्त्रीशूद्रातिशूद्राच्या शिक्षणावर बंदी लादली. आजही आमच्या लोकांशी धर्म कृत्याच्या निमित्ताने लगट करणारे भोळ्याभाबड्या माताभगिनी बांधवांना कपटाने खोटी माहिती देऊन महापुरुषांच्याबद्दल तिटकारा निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. अशा शिक्षणविरोधी रानटी लोकांपासून सावध राहिले पाहिजे.

स्त्री जर शिकली तर अख्खं कुटुंब बदलून जाते. महात्मा फुल्यांनी मुलींची पहिली शाळा सुरू केल्यानंतर त्या शाळेमध्ये सर्वाधिक मुली ब्राह्मण जातीच्या दाखल झालेल्या होत्या अर्थात सुधारणांना विरोध करणाऱ्यांनीच स्त्री शिक्षणाचा फायदा उचलला. नंतरच्या काळात मात्र मुली शिकू लागल्या आणि स्त्रियांचे शिक्षणाचे प्रमाण वाढत गेले. तथापि स्त्रिया शिक्षित झालेल्या असल्या तरी त्यांच्यामागील कर्मकांड धार्मिक अंधश्रद्धेचा ससेमिरा मात्र कायमचा चालूच राहिलेला दिसतो. याला कारणीभूत शिक्षणाचा आशय आणि बुवा बापू अम्मा साधू संत आणि महाराजांनी स्त्रियांना टार्गेट करून त्यांच्यामध्ये अंधश्रद्धा कर्मकांड आणि धर्मांधता कशी वाढेल याची कटकारस्थाने करून स्त्रियांना संपूर्णपणे पारंपरिक मानसिकतेत ठेवण्याचे काम केले. स्त्रिया ज्या पद्धतीनं अंधश्रद्धेच्या आहारी आणि कर्मकांडात गुंतल्या जातात त्यांचे अनुकरण करून त्यांच्या अवतीभवती वावरणारी मुलंमुली सुद्धा लहानपणापासून त्या संस्कारामध्ये वाढतात आणि त्याचा नकारात्मक परिणाम त्यांच्या सर्वांगीण विकासावर होतो. वैज्ञानिक दृष्टिकोन , चिकित्सावृत्ती, संवेदनशीलता, कार्यकारणभाव असो अथवा जिज्ञासावृत्ती प्रभावित होऊन त्यांची शैक्षणिक अभिरुची मंदावत जाते. आजी,आई जर घरामध्ये कर्मकांड करत असतील, घंटी वाजवून आरती करत असेल तर मुलंसुद्धा तसेच अनुकरण करून त्याच पद्धतीने लहानपणापासून वागत असतात. त्यांच्यामध्ये कर्मकांडांबद्दलची अकारण भिती आणि स्तोम माजवले की मुलं कमकुवत मनोवृत्तीची तयार होऊ लागतात. विद्यार्थ्यांचा अभ्यासाकडे कल हळूहळू कमी होतो. पाल्यांची अभ्यासाबद्दलची अनास्था पालकांना चिंतेत टाकणारी असते.

अभ्यासाचे मॉडेल विद्यार्थ्यांसमोर नसेल तर विद्यार्थी अभ्यास करण्याऐवजी निष्फळ रूढीवादी बाबींत आपसूकच गुंतले जातात. अभ्यास करणे हे बौद्धिक नेटाचे काम आहे. स्त्री असो का पुरुष एकदाचे शिक्षण थांबल्यानंतर नोकरी लागली उदरनिर्वाहाचे साधन प्राप्त झाले की बहुधा अध्ययनापासूनचा संबंध खंडित होऊन जातो. प्रौढ स्त्री-पुरुष फार वाचन करताना आढळत नाही.आडातच नाही पोहऱ्यात कुठून येणार? या म्हणीनुसार घरात अभ्यासाचं वातावरण नसेल तर विद्यार्थ्यांना अभ्यासात गोडी लागणार का? हा सर्वत्र अनुभव आपल्याला दिसून येतो. अभ्यास करण्याला कष्ट लागते ती कष्ट करण्याची प्रवृत्ती या अशा कर्मकांडांमुळे कमी झालेली दिसून येते. त्याचा परिणाम नवीन पिढीवर होऊन लहान मुलांना झपाटलेले दिसतात. हीच गोष्ट स्त्रियांना शिक्षणापासून वंचित ठेवण्यामागे धर्ममार्तंडांनी केलेली होती. आई जर शिकली नाही तर मुलं सुद्धा शिकत नाही. स्त्रियांना शिक्षणापासून दूर ठेवण्यासाठी धर्माच्या नावाखाली कपट कारस्थान करण्यात आले. आजही शिकलेल्या लोकांमध्ये धर्मांध प्रवृत्ती मोठ्या प्रमाणात कशी बळावेल यासाठी कार्यरत असलेले सनातनी आणि ब्राह्मणी कंपू यांच्यापासून सावध राहण्याची गरज आहे. अलीकडल्या काळात आपण पाहतो की धार्मिक उन्माद वाढलेला असून अगदी तरुण अवस्थेत मुलं धर्मांधतेकडे झुकली जातात. आणि त्याचा वापर प्रतिगामी आणि धर्मांध वृत्तीकडून मोठ्या प्रमाणात होताना दिसतो. याला कारणीभूत मानसिकता स्त्रियांमध्ये जडलेली धर्मांधता आहे. अंधश्रद्धा कर्मकांड यातून मुलांवर होणारे परिणाम आहे. त्या परिणामातून अशा पिढ्या घडण्याचे काम होते आणि त्याचा हातभार सनातन्यांच्या धार्मिक मतलबी कुरापतींना चालना देण्यासाठी, कारवायांना मदत करण्यासाठी या पिढ्यांचा जास्त होतो आहे. अर्थात यामुळे भारताचे भवितव्य धोक्यात आलेले दिसते आहे. शिक्षणामुळे सामाजिक भान आणि आत्मसन्मान विचार करण्याची क्षमता निर्माण होते त्यातून राष्ट्र बलशाली बनतात. परंपरेने शिक्षण नाकारलेल्या स्त्रिया, ओबीसी, दलित,विमुक्त भटक्या समाजाच्या शिक्षणासाठी महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, धोंडो केशव कर्वे, शाहू महाराज,कर्मवीर भाऊराव पाटील,बाबासाहेब आंबेडकर, पंजाबराव देशमुख वगैरे महामानवांनी आपली हयात खर्ची घातली. अज्ञानामुळे होणारे शोषण आणि शोषक समजले पाहिजे हा त्यांचा हेतू. धर्म ईश्वर नावाने होणारी फसगत समजून शोषण व्यवस्थेच्या विरोधात उभा होणारा भयमुक्त भटमुक्त समाज खासकरून स्त्रिया आणि मुलंमुली देशाची खरी ताकद आहे.

**अनुज हुलके**

# जिल्हा विकास निधी निर्धारित वेळेत खर्च करुन यंत्रणांनी गुणवत्तापूर्ण कामे करावी-पालकमंत्री इंद्रनील नाईक



## जिल्हा वार्षिक योजना आढावा

**गोंदिया :-** जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासासाठी अंमलबजावणी यंत्रणांना जिल्हा नियोजन समितीमार्फत निधी वितरीत करण्यात येतो. हा निधी निर्धारित वेळेत खर्च करुन गुणवत्तापूर्ण कामे करावी, असे निर्देश उद्योग राज्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री इंद्रनील नाईक यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन भवन सभागृहात आज जिल्हा वार्षिक योजना आढावा बैठक घेण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते. सभेला जिल्हाधिकारी प्रजित नायर, पोलीस अधीक्षक गोरख भामरे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरुगानंथम, उपवनसंरक्षक पवनकुमार जोंग, अपर जिल्हाधिकारी मिनाज मुल्ला, निवासी उपजिल्हाधिकारी भैय्यासाहेब बेहेरे, जिल्हा नियोजन अधिकारी सुनिल धोंगडे, माजी आमदार राजेंद्र जैन व विविध विभागाचे कार्यालय प्रमुख उपस्थित होते.

पालकमंत्री पुढे म्हणाले, नागरिकांच्या कामांना प्राधान्य देण्यात यावे. यावेळी त्यांनी जिल्ह्यातील वन विभाग, शिक्षण, लघुपाटबंधारे, वैद्यकीय शिक्षण, वैद्यकीय विभागातील विविध विषय, महिला व बालकल्याण, अपारंपारिक ऊर्जा, गृह विभाग, पर्यटन, ऊर्जा विभाग, उद्योग, सार्वजनिक बांधकाम, मृद व जलसंधारण, आदिवासी विकास या विभागांना मिळालेला निधी, होणारा खर्च याविषयीची माहिती जाणून घेतली. यामध्ये काही बदल सांगून अधिकाधिक लाभ लाभार्थ्यांना होईल, असे निर्देश दिले.

जिल्ह्यात झालेल्या अवकाळी पाऊसामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले. शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करुन नुकसान भरपाई मिळण्याकरीता शासनास अहवाल पाठविण्यात यावा, असे त्यांनी यावेळी सांगितले.

जिल्हाधिकारी श्री. नायर यांनी संगणकीय सादरीकरणाद्वारे गोंदिया जिल्ह्याची भौगोलिक माहिती दिली. तसेच बैठकीत २०२५-२६ मध्ये सुरु असलेल्या कामांचा आढावा सादर केला. जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत २०२५-२६ अंतर्गत एकूण मंजूर नियतव्यय ४०७ कोटी आहे. यामध्ये जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजनेसाठी २९८ कोटी रुपये, आदिवासी उपयोजनेसाठी ५०.१३९८ कोटी, आदिवासी क्षेत्रबाह्य उपयोजनेसाठी १२.६६६४, अनुसूचित जाती उपयोजनेसाठी ४६ कोटी रुपयांचा निधी निर्धारित करण्यात आलेला आहे.

दिनांक १ ऑगस्टच्या शासन मार्गदर्शक सूचनानुसार खरेदीची कमाल मर्यादा १० टक्के तर पुनर्विनियोजनची कमाल मर्यादा १० टक्के आहे. प्रशासकीय मान्यतेची कालमर्यादा ही आता ३१ ऑक्टोबर पर्यंत केली असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

यावेळी नर्सिंग कॉलेजला जागा देण्याबाबतची एकूण माहिती पालकमंत्री यांनी घेतली आणि यापूर्वी मंजूर झालेल्या जमिनी संदर्भातील कार्यवाहीची माहिती पुढील बैठकीत देण्यात यावी असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले. यासह विद्युत शवदाहिनी, अल्पसंख्याकांसाठी असलेल्या मौलाना आझाद विकास महामंडळ कार्यालय आदी बाबत प्रश्न उपस्थित करण्यात आले. यावरही सविस्तर माहिती घेऊन प्रश्न निकाली काढण्यात येतील, असे पालकमंत्र्यांनी यावेळी आश्वासीत केले. कार्यक्रमाचे संचालन जिल्हा नियोजन अधिकारी सुनिल धोंगडे यांनी केले.

# पोलिसांच्या पुढाकाराने दुर्गम वांगेतुरीत उभारले वाचनालय



### २०५ विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ

**यापुर्वी स्थापन करण्यात आलेल्या ७२ वाचनालयांचा लाभ अतिदुर्गम भागातील ८५०० पेक्षा जास्त युवक-युवती व नागरिकांना होत आहे. या माध्यमातून २०५ विद्यार्थी शासनाच्या विविध विभांगामध्ये भरती होण्यात यशस्वी झाले आहेत. गडचिरोली पोलिसांकडून राबविण्यात येणाऱ्या प्रभावी नागरी कृती उपक्रमांमुळे मागील पाच वर्षात गडचिरोली जिल्ह्यातून माओवादी संघटनेमध्ये एकही तरुण-तरुणी भरती झालेले नाही.**

**गडचिरोली :-** जिल्ह्यातील अतिदुर्गम भागातील शालेय विद्यार्थी, सुशिक्षित बेरोजगार, महिला-पुरुष यांना शासनाच्या मुख्य प्रवाहात आणून त्यांच्या शिक्षणासह बौद्धिक विकासाला वाव मिळण्यासाठी पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांच्या संकल्पनेतून ङ्गएक गाव, एक वाचनालयङ्ग हा उपक्रम सुरु आहे. या उपक्रमांतर्गत हेडरी पोलीस उपविभागातील वांगेतुरी येथे ७३ व्या सार्वजनिक वाचनालयाचे उद्घाटन शनिवारी करण्यात आले.

पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांच्या हस्ते आणि वरिष्ठ अधिकारी व परिसरातील नागरिकांच्या उपस्थितीत वांगेतुरी येथे सर्व सुविधांनी सुसज्ज अशा सार्वजनिक वाचनालयाचा उद्घाटन व लोकार्पण सोहळा पार पडला. विशेष म्हणजे गडचिरोली पोलीस दल, सीआरपीएफ, एसआरपीएफचे अधिकारी व अंमलदार, तसेच वांगेतुरी परिसरातील नागरिकांच्या लोकवर्गणीतून आणि श्रमदानातून या सुसज्ज व आधुनिक वाचनालयाची उभारणी करण्यात आली.

या लोकार्पण सोहळ्याची सुरुवात ग्रंथदिंडीने करण्यात आली. यात शालेय विद्यार्थी व स्थानिक नागरीकांनी पारंपरिक वेशभूषा करून व पारंपरिक वाद्य वाजवून उत्स्फुर्तपणे सहभाग नोंदवला. या वाचनालयामध्ये स्वतंत्र अभ्यासिका, बैठक व्यवस्थेकरीता टेबल, खुर्ची, पुस्तके ठेवण्याचे कपाट व इतर मुलभुत सुविधांसह सार्वजनिक वाचनालय उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

याप्रसंगी अपर पोलीस अधीक्षक (अहेरी) सत्य साई कार्तिक, अपर पोलीस अधीक्षक (प्रशासन) गोकुल राज जी, असिस्टंट कमांडण्ट सिआरपीएफ १९१ बटालियन मनोज कुमार, उपविभागीय पोलीस अधिकारी (हेडरी) योगेश रांजणकर, पोस्टे वांगेतुरीचे प्रभारी अधिकारी सपोनि दिलीप खडतरे, एसआरपीएफ ग्रुप १८, काटोल नागपूरचे पोउपनि. जनार्धन साबळे तसेच परिसरातील सरपंच, पोलीस पाटील, शालेय विद्यार्थी व स्थानिक नागरीक उपस्थित होते.

## प्रेस क्लब गोंदियाच्यावतीने नवनिर्वाचित पालकमंत्री नाईक यांचे स्वागत



**गोंदिया:-**राज्याचे बांधकाम ,आदिवासी व स्वयरोजगार विभागाचे राज्यमंत्री तसेच गोंदिया जिल्ह्याचे नवनिर्वाचित पालकमंत्री इंद्रनिल नाईक हे (दि.२७)गोंदिया जिल्हा भेटीवर आले असता त्यांचे जिल्हा नियोजन कार्यालयात प्रेस क्लब गोंदियाच्यावतीने पुष्प-गुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. तसेच जिल्ह्यातील विविध विषयावर संक्षिप्तमध्ये चर्चा करण्यात आली.पालकमंत्री नाईक यांनी पत्रकारांच्या सुचना ऐकत येत्या काही दिवसात सर्व पत्रकारांशी चर्चा करण्याचे आश्वासन दिले.

पालकमंत्री नाईक यांचे स्वागत प्रसंगी जिल्हाधिकारी प्रजित नायर,पोलीस अधिक्षक गोरख भामरे,मुख्य कार्यकारी अधिकारी एम.मुरगानांथम,निवासी उपजिल्हाधिकारी भैय्यासाहेब बेहरे,आदिवासी विभागाचे प्रकल्प अधिकारी उमेश काशिद,जिल्हा माहिती अधिकारी अंजु काबंळे निमसरकर आदी अधिकारी उपस्थित होते. यावेळी प्रेस क्लबचे पदाधिकारी हिदायत शेख,सावन डोये,संतोष शर्मा,खेमेंद्र कटरे, प्रमोद नागनाथे, मुनेश्वर कुकडे, देवेंद्र रहांगडाले, भरत घासले,शाहिद पठाण,राकेश रामटेके,दुर्गेश येल्ले आदी पत्रकार उपस्थित होते.

# ५२४ वाहन चालकांकडून ५ लाख २४ हजार दंड वसूल

## ३५ नागरिकांकडून गाडीवर फॅन्सी नंबरचे दंड वसूल




### ५.२४ लाखांचा दंड मोबाइलधारकांवर

**जिल्हा वाहतूक पोलिसांनी जानेवारी ते सप्टेंबर या नऊ महिन्यांत ५३४ मोबाइलधारक चालकांना पाच लाख २४ हजार रुपये दंड ठोठावला. यात दुचाकीचालकांसह चारचाकी चालकही आहेत. ते मोबाइलधारक वाहनचालक अपघातांसाठी कारणीभूत ठरतात.**

**गोंदिया :-** डिजिटलच्या जमान्यात स्मार्टफोन हा आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. मात्र, वाहन चालविताना त्याचा वापर करणे महागात पडू शकते. तरीही, बरेच लोक गाडी चालवताना कॉल किंवा मेसेज करण्यासाठी त्याचा वापर करतात. लोक वाहन चालविताना सोशल मीडिया तपासण्यासाठीही फोन वापरतात. पण, तुम्हाला माहीत आहे का की, गाडी चालविताना मोबाइल वापरणे हा कायदेशीर गुन्हा आहे आणि त्यासाठी तुम्हाला दंडसुद्धा होऊ शकतो.

गोंदिया जिल्हा पोलिसांनी जानेवारी ते सप्टेंबर या नऊ महिन्यांच्या कालावधीत चालविताना मोबाइलवर बोलणाऱ्या एकूण ५२४ वाहनधारकांना ५ लाख २४ हजार रुपयांचा दंड आकारला आहे. वाहतुकीचे नियम मोडले म्हणून पोलिसांनी नागरिकांकडून लाखोंचा दंड दहा महिन्यांत वसूल केला आहे. प्रत्येक चौकात वाहतूक पोलिस डिव्हाईस घेऊन नियम मोडणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी तत्पर असतात.

## आमगाव-सालेकसा-दरेकसा रस्त्याची दुरुस्ती करा,पालकमंत्र्यांना राष्ट्रवादीचे निवेदन

**सालेकसा:-** गोंदिया जिल्ह्याचे नवनियुक्त पालकमंत्री व राज्याचे सार्वजनिक बांधकाम, उद्योग, उच्च व तंत्र शिक्षण, आदिवासी विकास, पर्यटन,मृद व जलसंधारण विभागाचे राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांना सालेकसा तालुक्यातील विविध मागण्या व समस्यांचे निवेदन तालुकाध्यक्ष यांच्या नेतृत्वात देण्यात आले.



राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या कार्यकर्ता बैठकीत राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष सालेकसा तालुक्याचे वतीने सालेकसा आमगाव दरेकसा राज्यमार्ग ३३५ मध्ये जागोजागी पडलेले खड्डे आणि दुरूस्ती कार्य निधी अभावी थांबल्याने तात्काळ निधी उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली.तसेच अतिरिक्त वार्षिक देखभाल दुरुस्ती साठी निधी मंजूर करण्यात यावे यासाठी निवेदन देण्यात आले.

याप्रसंगी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष डॉ.अजय उमाटे, डॉ.हिरालाल साठवणे, ब्रजभूषण बैस,बाजीराव तरोने, महिला तालुका अध्यक्ष गीताताई चौधरी, रघुदास नागपुरे,किसन रहांगडाले, रत्नमाला किरसान,ललित किरसान, सुरेश कुंभरे, संजय वडगाये, हिरालाल घरत, रिषी बैस उपस्थित होते.

## ग्रामीण भागातुनही एखादा धोनी तयार व्हावा:- सौ.गहाणे

**अर्जुनी-मोर.**-क्रिकेट हा आंतरराष्ट्रीय दर्जाचा खेळ आहे.या खेळाचे फॅड आता गावखेड्यातही पोहचले आहे.खेड्यातील तरुणांमधे जणु काही क्रिकेट चे वेड लागल्याचे दिसुन येत असले तरी तरुणांनी आपल्या कॅरीयर कडे लक्ष ठेवुन अभ्यासांकडे लक्ष देवुन आपले भविष्य घडवावे,आणी क्रिकेट खेळातील स्पर्धेच्या माध्यमातून ग्रामीण भागातुन एखादा धोनी सारखा आंतरराष्ट्रीय दर्जाचा खेडाळु तयार व्हावा असे आवाहन जि.प.सदस्य सौ.रचनाताई गहाणे यांनी केले आहे.तालुक्यातील भिवखिडकी येथे आयोजित क्रिकेट स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी रचनाताई गहाणे बोलत होत्या.अध्यक्षस्थानी राष्ट्रवादी कॉंग्रेस तालुका अध्यक्ष लोकपाल गहाणे होते.अतिथी म्हणुन इंजी.राजेश लांजेवार, अरविंद नागपुरे,सरपंच धनराज कांबळे,राजेश नेवारे उपस्थित होते.

## रोहयोची कामे बंद; ग्रामपंचायतींचे मस्टर लॉक

### माजी जि. प. सदस्य गंगाधर परशुरामकर यांचा आरोप



**सडक अर्जुनी :-** राज्यात राबविण्यात येणारी रोजगार हमी योजना कालांतराने डॉक्टर मनमोहन सिंग यांच्या सरकारने स्वीकारून देश पातळीवर सुरू केली. मागेल त्याला काम असे, या योजनेच स्वरूप आहे. पण आताच्या सरकारने या योजनेत अनेक बदल केले असुन त्याचा फटका आता शेतकरी शेतमजूर यांना बसत आहे. सध्या तरी ही योजना गोंदिया जिल्ह्यात फक्त घरकुल आणि झाडे लावण्याच्या कामांपुरतीच राहिलेली आहे. ग्रामपंचायतींचे मस्टर लॉक केल्याचा आरोप माजी जि. प. सदस्य गंगाधर परशुरामकर यांनी केला आहे.

सडक आर्जुनी तालुक्यात ६३ ग्रामपंचायती आहेत. सर्व ग्रामपंचायतीत या योजनेची मोठ्या प्रमाणावर कामे झालीत. पण, सरकारकडून कुशल कामांची देयके मागील चार वर्षापासून न मिळाल्याने बहुतेक कामे अपूर्ण दिसतात. २० कामे एखाद्या ग्राम पंचायतमध्ये अपूर्ण दिसत असली, तर त्या पंचायतीचे मस्टर आपोआप लॉक होते. या तालुक्यातील सर्वच ग्राम पंचायतींचे मस्टर लॉक असल्याने घरकुल व झाडे लागवड या दोन कामांशिवाय मस्टर निघतच नाही. या योजनेत मोठ्या प्रमाणावर वैयक्तिक कामे करण्याची नियोजन आहे. त्यात गुरांचे

गोठे, शेतात सिंचन विहीर, कुकुट पालन केंद्र, गोटफार्म असे अनेक कामे करता येतात. अनेक ग्रामपंचायतीत वैयक्तिक लाभाचे असंख्य कामे प्रशासकीय मान्यता होवून पडुन आहेत. विहिरी, गोठे असे अनेक कामे आहेत. पण, ग्रामपंचायतीचे मस्टर लॉक असल्याने कामेच करता येत नाही व लाभार्थी वंचित राहत आहेत. कारण पूर्वीच्या कामांचे देयके शासनाने न दिल्याने काम अपूर्ण दिसत आहेत. त्यामुळे मस्टर लॉक झाले आहेत. घरकुलांचे बाबतीत तेच आहे. नवीन घरकुल सर्वेक्षण झाले, पण अजून मंजुरी नाही. त्यामुळे जुनीच काही कामे सुरू आहेत. जुन्या सर्वच म्हणजे रमाई, शबरी, मोदी आणि यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत या सर्व योजना शासनाने बंद केल्या आहेत. नवीन सर्वेक्षण झालेली यादी अजून गुलदस्त्यात आहे. त्यामुळे यांचे मस्टर काढण्याचा प्रश्नच नाही. पावसाळा संपल्याने झाडे लावण्याचा कार्यक्रमसुद्धा बंद आहे. त्यामुळे रोजगार हमीची कामे सध्या बंद अवस्थेत आहेत. ना वैयक्तिक लाभाच्या योजना, ना सार्वजनिक हिताच्या योजना, ना घरकुल, ना झाडे लावणे अशी अवस्था या सरकारने रोजगार हमी योजनेची केली, असा आरोप माजी जिल्हा परिषद सदस्य गंगाधर परशुरामकर यांनी केला आहे.

## ऑनलाइन नोंदणी रखडली ;शासकीय धान खरेदी केंद्र सुरू करा

**नवेगावबांध:-** खरीप हंगामातील हलक्या धानाची कापणी व मळणी झाली असून भारी धानपीकही लवकरच कापणीला येणार आहेत. त्यामुळे शासनाने लवकरात लवकर शासकीय आधारभूत धान खरेदी केंद्र सुरू करावे, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

वाढलेला शेती खर्च, पावसाची लहरीपणा आणि बाजारातील दरकपात या तिहेरी संकटामुळे शेतकरी अक्षरशः हवालदिल झाले आहेत. शासकीय धान खरेदी केंद्र सुरू करण्यास होत असलेल्या विलंबामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व संतापाची भावना निर्माण झाली आहे. ऑनलाइन धान विक्री नोंदणी प्रक्रिया अद्यापही सुरू व्हायची

आहे. तिही रखडलेलीच आहे. नोंदणीच झाली नाही. त्यामुळे धान खरेदीही उशिरा सुरू होण्याची अधिक शक्यता निर्माण झाली आहे. दरम्यान, ऑनलाइन नोंदणी, धान खरेदी केंद्र त्वरित सुरू करावे, अशी मागणी नवेगावबांध, सावरटोला, देवलगाव, मुंगली, भिवखिडकी, धाबेपवनी, केशोरी, इर्ळदा, राजोली येथील शेतकऱ्यांनी केली आहे.

# जावयाच्या सन्मानाने उजळली बलिप्रतिपदा

## सावरटोला येथे साडी-चोळी देऊन लेकीचा सन्मान : गावकऱ्यांनी परंपरा ठेवली कायम



### संस्काराची परंपरा जपणारे गाव म्हणजे सावराटोला - लायकराम भेंडारकर

**मजबुती आणि गावाच्या संस्कृतीचा संस्कारांची परंपरा जपणारे सावरटोला हे गाव म्हणजे एक संस्कारांचे विद्यापीठच आहे. जावयाचा सन्मान म्हणजे नात्यांची गौरव. दिवाळीच्या धावपळीतही सावरटोला ग्रामस्थांनी प्रेम, स्नेह, आदराचा दीप प्रज्वलित करून बलिप्रतिपदेचा खरा अर्थ उजळिवला. या अनोख्या सन्मान सोहळ्याने जावयाच्या सन्मानाने बलिप्रतिपदा उजळली, असं म्हणणं वावगं ठरणार नाही, असे प्रतिपादन जि. प. अध्यक्ष लायकराम भेंडारकर यांनी केले.**

**गोंदिया :-** दिवाळीचा पाडवा बलिप्रतिपदा, प्रेम, आपुलकी आणि संस्कारांची सांगड घालणारा दिवस. या दिवशी अर्जुनी मोरगाव तालुक्यातील सावरटोला गावात मागील दहा वर्षांपासून सुनील तरोणे यांच्या पुढाकारातून एक आगळावेगळा नवदाम्पत्य सन्मान सोहळा हा उपक्रम राबविला जात आहे. लग्न होऊन पहिल्यांदाच दिवाळीत माहेरी व सासरी येणाऱ्या जावई व मुलीचा साडी चोळी, शाल, पुष्पगुच्छ आणि मिठाई देऊन सन्मान केला जातो. या माध्यमातून नवदाम्पत्याला आपुलकी, प्रेम आणि नव्या जबाबदाऱ्यांची जाणीव करून देण्यात आली. हा उपक्रम बुधवारी (दि. २२) पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व माता जिजाऊ पूजनाने झाली. पूजन विष्णूप्रसाद अग्रवाल यांच्या हस्ते पार पडले. या कार्यक्रमाला जि. प. अध्यक्ष लायकराम भेंडारकर, लोकपाल गहाणे किशोर तरोणे, सरपंच युवराज तरोणे, राजेश मुनेश्वर, यादवराव तरोणे, राधेश्याम तरोणे, चिंतामण तरोणे, पांडुरंग भोपे, मनोहर तरोणे, देवराम तरोणे, संजय राऊत, रघुनाथ शिवणकर, कुरुंदा वैद्य, भीमराव रामटेके, सचिन शिवणकर, गोवर्धन मुनेश्वर, संदीप तरोणे व रामदास बोरकर उपस्थित होते.

यावेळी कुमुद हरिश्चंद्र भंडारकर (मरेगाव), दामिनी हरीश आंबेडारे (आसोली) व वर्षा पंकज दोनोडे (रनाडा) या नवदाम्पत्याचा साडी-चोळी, शाल, पुष्पगुच्छ व मिठाई देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनील व स्नेहल तरोणे यांनी केले. गुरुदेव सेवा मंडळाचे तरुण युवक-युवती आणि ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रम अविस्मरणीय केला.

# पदवीधरसाठी युवा ग्रॅज्युएट फोरमचा सक्रिय



### एकजुटीने या मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन

**गोंदिया जिल्ह्यातून २५ हजार पदवीधर मतदारांची नोंदणी करण्याचा संकल्प युवा ग्रॅज्युएट फोरमने केला असून, सर्व सामाजिक संघटनांनी एकजुटीने या मोहिमेत सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले. मार्गदर्शन बैठकीत पुढील वर्षी होणाऱ्या नागपूर पदवीधर निवडणुकीची पार्श्वभूमी, त्यातील रणनीती, आणि युवकांचा वाढता सहभाग यावर सविस्तर चर्चा झाली. मागील निवडणुकीत युवा ग्रॅज्युएट फोरमचे अतुल खोब्रागडे यांनी तिसरा क्रमांक पटकावून निर्णायक भूमिका बजावली होती, हे यावेळी विशेष अधोरेखित करण्यात आले**

**गोंदिया:-** नागपूर पदवीधर मतदारसंघातील मतदार नोंदणी व निवडणूक प्रक्रियासंदर्भात सविस्तर माहिती देण्यासाठी गुरुवारी (दि. २३) गोंदिया गेस्ट हाऊस येथे युवा ग्रॅज्युएट फोरमतर्फे मार्गदर्शन व चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे सिनेट सदस्य राहुल हनवते आणि संस्थेचे सदस्य तसेच आयटी अभियंता धम्मानंद हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते.

राहुल हनवते यांनी पदवीधर मतदारसंघाचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, पदवीधर वर्गाची मतदार म्हणून नोंदणी आणि सहभाग ही केवळ निवडणुकीपुरती बाब नाही, तर शिक्षित समाजाच्या प्रतिनिधित्वाची गरज आहे. तरुणांनी पुढाकार घेत मतदार म्हणून नोंदणी करावी आणि सक्रिय भूमिका घ्यावी, असे सांगितले.

आयटी अभियंता धम्मानंद म्हणाले की, नागपूर पदवीधर मतदारसंघ हे सुशिक्षित पदवीधरांचे हक्काचे स्वतंत्र व्यासपीठ आहे. या निवडणुकीत सामाजिक व शैक्षणिक पातळीवर महत्त्वपूर्ण भूमिका बजावण्याची संधी आहे.

पारंपरिक राजकारणापेक्षा ही निवडणूक वेगळी असून, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राऐवजी बॅलेट पेपरवर आधारित मतदान पद्धतीने घेतली जाते. या निवडणुकीत मतदारांना एकापेक्षा अधिक उमेदवारांचे प्राधान्य अनुसार पर्याय उपलब्ध असतात, हे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाची सुरुवात बळीराजांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून करण्यात आली. याप्रसंगी अतुल सतदेवे, वसंत गवळी, सी. पी. बिसेन, यशवंत रामटेके, भोजराज ठाकरे, रवी भांडारकर, उमेश कटरे, सुशील गेडाम, अनिल गोंडाणे, पंचशीला पानतावणे, रोमेंद्र बोरकर, सुंदरलाल लिल्हारे, अरुण बन्नाटे, राजीव ठकरेले, मंगेश सतदेवे आदी मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक अतुल सतदेवे यांनी सादर केले.


# कार्यालय ग्रामपंचायत दासगांव(बु.)

## पंचायत समिती गोंदिया,जिल्हा परिषद-गोंदिया

## निविदा सुचना क्र.१

## (पहिली वेळ सन २०२५-२६)

ग्रामपंचायत दासगांव (बु.) पं.स. गोंदिया, जिल्हा परिषद गोंदिया येथे अंतर्गत विविध योजना अंतर्गत कामाचे मोहोरबंद निविदा ब-१ टक्केवारी,प्रपत्रामध्ये बांधकाम विभाग जि.प.गोंदिया यांच्याकडे नोंदणीकृत कंत्राटदाराकडून मागविण्यात येत आहे.कोऱ्या निविदा ग्रामपंचायत कार्यालय दासगांव (बु.)कडून देण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित किमंत | निविदा व फार्मची किमंत | निविदेसोबत भरावयाची रक्कम | काम पुर्ण करण्याचा कालावधी | कंत्राटदाराचे वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | सार्वजनिक शौचालय बांधकाम | ३०००००/- | १०००/- | ३०००/- | ३ महिने | वर्ग ८ च्यावरील |

**वरील कामाची निविदा प्रकाशित दिनांक**:- २८/१०/२०२५
**कोऱ्या निविदा मिळवण्याचा दिनांक** :- २९/१०/२०२५ ला सकाळी १०.०० वाजेपासून
**निविदा दाखल करण्याची सुरवाती** दिनांक :-२९/१०/२०२५
**निविदा दाखल करण्याची अंतिम दिनांक**- ०६/११/२०२५,दुपारी ०२.०० वाजेपर्यंत
**निविदा उघडण्याचा दिनांक** ०६/११/२०२५ दुपारी ०३.००वाजे(शक्य झाल्यास)

ग्रामपंचायत दासगाव(बुं.) येथे निविदा फॉर्म विक्री करण्यात येईल व निविदा फॉर्म खरेदी केल्यानंतर त्याची पावती मिळेल.ग्रामपंचायत कार्यालय येथे अमानत रक्कम भरल्याची पावती मिळेल.सदर कामाची तपशिलवार संपुर्ण माहिती अटी व शर्तीसह ग्रामपंचायत कार्यालय येथील नोटीस बोर्डावर प्रसिद्ध केली आहे.

**सौ.राणुताई दिनेश तुरकर**
**सरपंच**
**ग्रामपंचायत दासगाव(बुं.)**

**ओ.के.रहागंडाले**
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत दासगाव(बु.)**

# सौंदड ग्राम पंचायतीत १.४० कोटीचा भ्रष्टाचार



## चौकशी समितीकडून अनियमिततेवर शिक्कामोर्तब

**गोंदिया :** – सौंदड ग्राम पंचायतीमध्ये गेल्या काही महिन्यापासून भ्रष्टाचाराचे आरोप आणि पारदर्शक कामामुळे होणारे पोटसुड असा आरोप–प्रत्यारोप सुरू होता. या प्रकरणात झालेल्या चौकशीनंतर सौंदड ग्राम पंचायतीच्या भ्रष्टाचाराचे पितळ उघडे पडले आहे. केलेल्या तक्रारीतील दहा मुद्द्यांच्या चौकशी दरम्यान १ कोटी ४४ लाख ४० हजार ९४४ रूपयाची अनियमितता झाल्याचा ठपका ठेवला आहे. यात सरपंच व तत्कालीन ग्रामविकास अधिकारी यांचे कर्तव्यात कसूर कारणीभूत असल्याचे नमुद केले आहे. यामुळे सौंदड ग्राम पंचायतीचा भ्रष्टाचाराचा जीन पुन्हा बाटलीबाहेर पडला आहे.

सडक अर्जुनी तालुक्यातील सौंदड ग्राम पंचायतीवर ९ जानेवारी २०२३ रोजी हर्ष मोदी हे सरपंच पदी आरूढ झाले. दरम्यान सौंदड ग्राम पंचायतीच्या स्थानिक राजकारण चव्हाट्यावर आले. एक वर्षानंतरच विरोधकांकडून सरपंच हर्ष मोदी यांच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जावू लागले. त्यातच सरपंच हर्ष मोदी व उपसरपंच रोशन शिवणकर हे भ्रष्टाला घेवून आमनेसामने आले. ऑक्टोबर २०२४ मध्ये रोशन शिवणकर व काही ग्राम पंचायत सदस्यांनी खंविअ यांच्याकडे विकासकामात अनियमितता होत आहे, अशी तक्रार केली होती. तक्रारीवरून कसलीही कारवाई होत नसल्याचे लक्षात घेत उपसरपंच रोशन शिवणकर यांनी आमरण उपोषण सुरू केला. उपोषणात आश्वासन मिळाले. मात्र त्यानंतर कसलीही चौकशी झाली नाही. आंदोलनाला घेवून पुन्हा वाद उफाळून आला. सोशल मिडीयावर वार सुरू झाले. दरम्यान मुकाअ यांना चौकशी करण्याची विनंती करण्यात आली. त्यामुळे उपमुकाअ यांच्या आदेशान्वये चौकशी समिती नेमण्यात आली. समितीकडून १० तक्रारींची इतभूत चौकशी केली. चौकशी दरम्यान विविध लेखाशिर्षक अंतर्गत ग्राम पंचायतीकडून करण्यात आलेल्या कामात मोठ्या प्रमाणता अनियमितता झाल्याची बाब अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आली. चौकशी समितीने आपले अहवाल जि.प.चे उपमुकाअ यांच्याकडे सादर केले. यामध्ये जवळपास १ कोटी ४४ लाख ४० हजार ९४४ रूपयाची अनियमितता झाल्याचे अभिप्रायात नोंदविले आहे. यासाठी ग्राम पंचायत सरपंच हर्ष मोदी व तत्कालीन ग्रामविकास अधिकारी पटले हे आपल्या जबाबदारी व कर्तव्य नियमानुसार कामे केली नाहीत, असे दिसून आल्याचे नमुद केले आहे. यामुळे सौंदड ग्राम पंचायतमध्ये गेल्या दोन वर्षात विकासाच्या नावावर करण्यात आलेल्या वाज्यागाज्याची पोलखोल झाली आहे.

### कर्तव्यात कसूर मानून पदमुक्त करावे : शिवणकर

**गेल्या वर्षभरापासून सुरू असलेल्या भ्रष्टाचाराच्या संदर्भात उपसरपंच रोशन शिवणकर व त्यांचे सहकार्‍?यांनी गोंदिया येथे माध्यमाच्या प्रतिनिधींशी संवाद साधला. दरम्यान आपण केलेले आरोप हे सत्य ठरले. सत्य कधीही लपविता येत नाही, असत्यावर सत्याचा नेहमीच विजय होतो. हे चौकशी समितीच्या अहवालावरून समोर आले आहे. आपण केलेले आरोप सिद्ध झाले आहेत. चौकशी समितीच्या अभिप्रायानुसार ग्राम पंचायतीमध्ये गेल्या दोन वर्षात १ कोटी ४४ लाख ४० हजार रूपयाची अनियमितता झाली आहे. हा तर तक्रारीत नमुद बाबींचाच हिशोब आहे. याहून अधिक भ्रष्टाचार झाला आहे. त्यामुळे आता जिल्हा प्रशासनाकडून ग्राम पंचायत लेखा संहिता अंतर्गत तथा महाराष्ट्र ग्राम पंचायत अधिनियमाच्या कलमान्वये सरपंच हर्षकुमार मोदी व तत्कालीन ग्राम विकास अधिकारी पटले यांच्यावर शिस्तभंगासह पदमुक्त करण्याची कारवाई व्हावी, अशी मागणी आपली राहणार आहे. जे सत्य होते, ते समोर आले. जनतेसमोर पारदर्शक कामाचा वाजागाजा करणाऱ्यांची पोलखोल झाली आहे, असे व्यक्त करीत सौंदड ग्राम पंचायतीच्या कामाकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. यावेळी त्यांच्यासोबत माजी सरपंच गायत्री इरले, ग्रा.पं.सदस्य वैफ्लाश इरले, योगेश्वर निर्वाण, समाधान बडोले, हेमराज डोंगरवार, नंदकिशोर डोंगरेवार, देवदास निंबेकर, अर्चना डोंगरवार, रेखा राऊत आदि उपस्थित होते.**

# २३०९ हेक्टरवरील नुकसान;६३९८ शेतकऱ्यांना मिळणार नुकसान भरपाई

**गोंदिया :–** जिल्ह्यात सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना ६३९८ नुकसानभरपाई देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. याअंतर्गत जिल्ह्यातील २३०९.४६ हेक्टर क्षेत्रातील बाधित पिकाकरिता ३ कोटी ५० लाख रुपयांचा निधी वितरित करण्यास शासनाने १८ ऑक्टोबर रोजी मंजुरी दिली आहे.

अतिवृष्टी, पूर व चक्रीवादळ यांसारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतीपिकांचे नुकसान झाल्यास पुढील हंगामामध्ये उपयोगी पडावे, याकरिता शेतकऱ्यांना निविष्ठा अनुदान स्वरूपात एका हंगामात एक वेळेस याप्रमाणे राज्य मान्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून विहित दराने मदत देण्यात येते.



तसेच राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या इतर बाबींकरितादेखील विहित दराने मदत देण्यात येते. सप्टेंबर २०२५ मध्ये राज्यात विविध जिल्ह्यांत मअतिवृष्टी व पूरफ यामुळे शेतीपिकांच्या नुकसानीसाठी शेतकऱ्यांना मदत देण्याकरिता शासन निर्णयान्वये निश्चित केलेल्या दरानुसार रुपये ३ कोटी ५० लाख २१ हजार रुपयांचा निधी वितरित करण्यास शासनाने मंजूरी दिली आहे.

### नुकसानभरपाईची रक्कम डीबीटीद्वारे

**नुकसानभरपाईची रक्कम जिल्ह्यातील ६३९८ नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर डीबीटी पोर्टलद्वारे लाभार्थ्यांना थेट त्यांच्या बँक खात्यात निधी वितरित केला जाणार आहे. सर्व लाभार्थ्यांची माहिती विहित नमुन्यात काळजीपूर्वक तयार करून संबंधित अधिकाऱ्यांनी ती संगणकीय प्रणालीवर भरून मान्यतेबाबत नियमानुसार कार्यवाही करावी. चालू हंगामामध्ये यापूर्वी सर्व विभागांना शेतपिकांच्या नुकसानीकरिता वितरित करण्यात आलेल्या मदतीच्या निधीमध्ये या प्रस्तावांतर्गत मागणी करण्यात आलेल्या निधीचा समावेश नाही.**

### मदत वाटपानंतर यादी होणार प्रकाशित

**लाभार्थ्यांना मदत वाटपाची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर लाभार्थ्यांची यादी व मदतीचा तपशील जिल्ह्यांच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावा. या आदेशाद्वारे तसेच यापूर्वी वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशाद्वारे नैसर्गिक आपत्तीमध्ये शेतकऱ्यांना दिलेला मदतीचा निधी बँकांनी कर्ज खात्यात अथवा वसुलीसाठी वळता करू नये, याकरिता जिल्हाधिकारी यांनी सर्व बँकांना आवश्यक त्या सूचना निर्गमित कराव्यात, असेही आदेश महसूल विभागाच्या वतीने १८ ऑक्टोबर रोजी काढलेल्या परिपत्रकातून देण्यात आले आहे**

# ‘महाज्योती’ ला अत्यल्प निधी ही ओबीसींची फसवणूकच !




**नागपूर :–** लोकसंख्येचा विचार न करता इतर संस्थांप्रमाणेच महाज्योती संस्थेलाही केवळ ३०० कोटी रुपये मंजूर करण्यात आले. ही ओबीसींची फसवणूकच आहे, असा आरोप ओबीसी युवा अधिकार मंचचे मुख्य संयोजक उमेश कोराम यांनी शुक्रवारी आयोजित पत्रकार परिषदेत केला.

कोराम म्हणाले, इतर इतर संस्था आणि महाज्योतीच्या विद्यार्थ्यांच्या संख्येत खूप मोठी तफावत आहे. महाज्योतीची विद्यार्थी संख्या जास्त असल्याने १००० कोटी रुपये अधिक उपलब्ध करून द्यायला हवा.

राज्य सरकारच्या धोरणामुळे ओबीसी समाजावर अन्याय होत आहे. मागील आर्थिक वर्षात २९७कोटींचा निधी मंजूर असताना फक्त २०७ कोटी रुपये देण्यात आले. यात ९० कोटींची कपात करण्यात आली.

२०२५–२६ आर्थिक वर्षात सुद्धा मंत्रिमंडळाने ४५३ कोटी रुपये मंजूर केले होते. परंतु प्रत्यक्षात अर्थसंकल्पात फक्त ३०० कोटी रुपये देण्यात आले. म्हणजे १५३ कोटी रुपयांची कपात करण्यात आली. टार्टी, बार्टी, सारथी आणि महाज्योती या संस्थांमार्फत राबविल्या जाणाऱ्या योजनांच्या अनुषंगाने अर्थ मंत्रालयाच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत, सर्व संस्थांना समान निधी देण्याचा निर्णय घेण्यात आला. मात्र, ही वाटणी लोकसंख्येच्या प्रमाणात न करता सरसकट केल्याने ओबीसी समाजाची फसवणूक होत आहे.

ओबीसी विद्यार्थ्यांसाठी सुरू असलेल्या यूपीएससी व एमपीएससी प्रशिक्षण योजनांमध्ये देखील मोठी कपात झाली आहे. यूपीएससी साठी विद्यार्थ्यांची संख्या २००० वरून १०० आणि एमपीएससी साठी ४००० वरून ४०० करण्यात आली आहे.तसेच, पीएचडी फेलोशिपसाठी केवळ १०० जागा उपलब्ध करून दिल्या असून, ती संख्या १००० करण्यात यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली आहे. याशिवाय, बार्टी, टार्टी, सारथी संस्थांच्या विद्यार्थ्यांना फेलोशिप देण्यात आली. परंतु, महाज्योतीच्या २०२३ बॅचच्या विद्यार्थ्यांना अद्याप फेलोशिप देण्यात आलेली नाही. यावरून शासनाचा दुटप्पीपणा स्पष्ट होत असल्याचा आरोप कोरीम यांनी केला.

या पत्रकार परिषदेला पीयूष आकरे, कृतल आकरे, शुभम तिखट, प्रतीक बावनकर, मनोज वानखेडे, विनीत गजभिये उपस्थित होते.

# याचिकाकर्त्यानेच मागे घेतली सुरजागडविरूद्धची याचिका

**गडचिरोली :–** जिल्ह्यातील लॉयड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेडच्या सुरजागड खाणींना पर्यावरण विभागाने दिलेल्या मंजुरीला आव्हान देण्यासाठी दाखल याचिका अपिलकर्त्याने मागे घेतली आहे. पर्यावरण विभागाने मंजुरी देताना नियम आणि प्रक्रियेचे पालन करूनच मंजुरी दिली असल्याचे निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने नोंदविले. त्यामुळे दाखल याचिका ही प्रायोजित असल्याचा संशय व्यक्त करत सर्वोच्च न्यायालयाने याचिकाकर्ता समरजित चॅटर्जी यांना दंड ठोठावण्याचा इशारा दिला होता. त्यामुळे चॅटर्जी यांनी ती याचिका अखेर मागे घेतली.




लॉयड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेड (एलएमईएल)च्या सुरजागड लोहखनिज खाणींना पर्यावरण मंजुरी (ईसी) देण्याबाबत दाखल केलेल्या अपिलात सर्वोच्च न्यायालयाला याचिकाकर्त्याला दावा दाखल करण्याचा अधिकारच आढळला नाही. ती याचिका “प्रायोजित’ असल्याचा संशय व्यक्त करीत याचिकाकर्त्यावर मोठा दंड ठोठावण्याचा इशारा न्यायालयाने दिला. त्यामुळे याचिकाकर्ता समरजीत चॅटर्जी यांनी दंड टाळण्यासाठी याचिका मागे घेतली.

या वर्षाच्या सुरुवातीला मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने एलएमईएलच्या सुरजागड लोहखनिज खाणींच्या क्षमता विस्ताराच्या परवानगीला आव्हान देणाऱ्या दोन जनहित याचिका (पीआयएल) फेटाळून लावल्या होत्या. उच्च न्यायालयाने दोन्ही जनहित याचिका ङ्गयोग्यताविहीनफ असल्याचे म्हटले होते. छत्तीसगडमधील रायपूर येथील खाण कंत्राटदार समरजीत चॅटर्जी यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या ९ मे २०२५ च्या नागपूर खंडपीठाच्या निकालाविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात विशेष याचिका (एसएलपी) दाखल केली होती.

न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती संदीप मेहता यांचा समावेश असलेल्या सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने अशा जनहित याचिका ङ्गप्रायोजित जनहित याचिकांशिवाय दुसरे काहीही नाहीफ असे निरीक्षण नोंदवत याचिकाकर्त्यावर मोठा दंड ठोठावण्याचा इशारा दिला.

दंड टाळण्यासाठी याचिकाकर्त्याच्या वकिलाने अपील मागे घेतले. न्यायालयाने पुढे असे निरीक्षण नोंदवले की कायद्याअंतर्गत घालून दिलेल्या नियम आणि प्रक्रियेचे पालन केल्यानंतरच सक्षम अधिकाऱ्यांनी प्रकल्प प्रस्तावक एलएमईएलला पर्यावरण मंजुरी दिली होती.याचिकाकर्ता चॅटर्जी यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या पूर्वीच्या आदेशाचे पालन केलेले नाही. त्याच प्रकरणात आजपर्यंत २५ हजार रुपये दंडाची रक्कम भरण्यासही ते अयशस्वी ठरले आहेत, हे उल्लेखनीय.

# बिहारनंतर आता देशातील १२ राज्यांमध्ये होणार “एसआयआर”




**नवी दिल्ली :–** आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भारतीय निवडणूक आयोगाने मोठा निर्णय घेतला. देशभरातील १२ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये मतदारांच्या यादीच्या विशेष सुधारणा मोहिमेचा (Secial Intensive Revision - SIR) दुसरा टप्पा लवकरच राबवला जाणार असल्याची घोषणा आयोगाने सोमवारी (२७ ऑक्टोबर) केली.

दिल्लीत आयोजित विशेष पत्रकार परिषदेत मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी ही माहिती दिली. बिहारमधील “एसआयआर’ मोहीम यशस्वी झाल्यानंतर आयोगाने ३६ राज्य निवडणूक आयुक्तांशी चर्चा करुन हा निर्णय घेतला.

### पुढील वर्षी निवडणुका असलेल्या राज्यांवर लक्ष

पुढील वर्षी ज्या राज्यांमध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत, त्या राज्यांमध्ये ही मोहीम महत्त्वाची ठरणार आहे. यात प्रामुख्याने तमिळनाडू, पश्चिम बंगाल, केरळ, आसाम आणि पुद्दुचेरी या राज्यांचा समावेश आहे. यापूर्वी, ६ ऑक्टोबर रोजी मुख्य निवडणूक आयुक्तांनी संपूर्ण देशभरात मतदार याद्यांच्या सुधारणेची घोषणा केली होती.

दरम्यान, निवडणुक आयोगाने ज्या १२ राज्यांची यादी प्रसिद्ध केली आहे त्या यादीत महाराष्ट्राचे नाव नाही. म्हणजेच या दुसऱ्या टप्प्याता महाराष्ट्रात SIR होणार नाही हे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील निवडणुका होणार हे निश्चित मानले जात आहे.

### “एसआयआर” मोहीम म्हणजे काय?

“एसआयआर” (SIR) ही निवडणूक आयोगाने राबवलेली एक व्यापक मतदार यादी अद्ययावत करण्याची प्रक्रिया आहे. याचा मुख्य उद्देश, घर–घरात जाऊन पडताळणी करणे आणि एक नवीन व अचूक मतदार यादी तयार करणे आहे. या प्रक्रियेद्वारे, केवळ पात्र नागरिक मतदार यादीत समाविष्ट केले जावेत, याची खात्री केली जाते आणि त्याचबरोबर डुप्लिकेट, मृत आणि अपात्र लोकांची नावे यादीतून वगळली जातात. या मोहिमेला “विशेष’ म्हटले जाते, कारण ती सामान्य वेळापत्रकाबाहेर आयोजित केली जाते. या मोहिमेत दारोदारी जाऊन पडताळणी, क्षेत्रीय तपासणी आणि अनेक नोंदींची क्रॉस–चेकिंग केली जाते.

### मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या माध्यमातून गरजू रुग्णाला दिलासा

**भंडारा –** गरजू रूग्णांना वेळेत वैद्यकीय मदत मिळवून देण्यासाठी देवेंद्र फडणवीस यांच्या संवेदनशील नेतृत्वाखाली जिल्हा कक्षाची स्थापना करण्यात आली. जिल्हा कक्षामुळे गाव, वाडी, वस्ती, पाडे, तांडे येथील गरजू रूग्णांना वेळेत मदत मिळत होत असल्यान दिलासा मिळत आहे, दरम्यान भंडारा जिल्ह्यातील साखळी (ता. तुमसर) येथील संदीप ब्रीजलाल आचरकाटे या तरुणावर तातडीने हिप रिप्लेसमेंट शस्त्रक्रिया करण्यात आली.गेली अनेक दिवसांपासून उपचाराविना रूग्णाचे हाल होत होते. त्यातच त्यांना मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीबाबतची माहिती मिळाली. पुढे संदीप यांनी जिल्हा कक्षाकडे धाव घेतली.

# राष्ट्रवादी काँग्रेसच्यावतीने पालकमंत्री नाईक यांचे स्वागत



**गोंदिया:–** जिल्ह्याचे पालकमंत्री इंद्रनील नाईक यांच्या गोंदिया आगमनाच्या निमित्ताने खासदार प्रफुलभाई पटेल यांच्या पाल चौक स्थित जनसंपर्क कार्यालयात माजी आमदार राजेंद्र जैन, जिल्हाध्यक्ष प्रेमकुमार रहांगडाले तसेच पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

या प्रसंगी पालकमंत्री नाईक यांना गोंदिया जिल्ह्यातील विविध स्थानिक समस्या अवगत करून देण्यात आल्या. विशेषतः अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे झालेले नुकसान, प्रलंबित बोनसचा प्रश्न, तसेच रब्बी हंगामातील उर्वरित धानाच्या चुकाऱ्यांचा विषय यावर चर्चा करून तातडीने कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली. यावेळी मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ता उपस्थित होते.

### राष्ट्रवादी काँग्रेस(शप)पक्षाच्या प्रदेश चिटणीसपदी सौरभ रोकडे



**गोंदिया–** राष्ट्रवादी काँग्रेस(शरदचंद्र पवार)महाराष्ट्र प्रदेश पक्षाच्या राज्य कार्यकारीणीचा विस्तार करण्यात आले असून यात गोंदिया जिल्ह्याचे माजी जिल्हाध्यक्ष सौरभ रोकडे यांची प्रदेश चिटणीस पदी निवड करण्यात आल्याचे सरचिटणीस रविंद्र पवार यांनी पत्रकातून म्हटले आहे. रोकडे यांच्या निवडीबद्दल जिल्हाध्यक्ष गुड्डू बोपचे,भुमेश शेंडे,तिरथ येटरे यांच्यासह अनेकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# पिकांच्या संरक्षणासाठी माऱ्यावर जागते रहो

## चहूबाजूने वाईल्ड लाईफने वेढलेल्या थाटेझरीतील प्रकार, गावात जाण्यासाठीच्या रस्ता दुरुस्तीला वाईल्ड लाईफचा खोडा



**गोंदिया :–** कोसमतोंडीवरून दोन किमी अंतरावर थाटेझरी नावाचे आदिवासीबहूल गाव आहे. या गावाच्या चारही बाजूने वाईल्ड लाईफचा भाग आहे. यामुळे या गावात जाणारा रस्ता दुरुस्त करता येत नाही. शिवाय वन्यप्राण्यांमुळे धानपिकांचे नुकसान होते. त्यामुळे पिकांच्या संरक्षणासाठी शेतकऱ्यांना माऱ्यावर जागरण करावे लागते. शिवाय वन्यप्राणी शेतात घुसून त्यांनी नुकसान करू नये, यासाठी वेगवेगळ्या क्लुप्त्या लढवाव्या लागतात.

थाटेझरी ८० घरांचे गाव. एक अनुसूचित जातीचे आणि चार गोवारी समाजाचे घरं सोडले तर सुमारे ७५ कुटुंब आदिवासी समाजाचे. ४५० लोकसंख्या असलेले हे गाव कोसमतोंडी गटग्राम पंचायतीमध्ये येते. थाटेझरीतील एक ग्रामपंचायत सदस्य आहे. या गावातील बहुसंख्ये लोकं कुंभरे, सयाम, मडावी, वट्टी हे सर्व आदिवासी. आधी एफडीसीएमच्या जंगलावर निर्भर राहणारे हे लोकं. पण, नागझिरा व्याघ्र प्रकल्प झाला. तेव्हापासून या आदिवासींच्या जीवनात अंधार आला. काही आदिवासी रोजगारासाठी शहरात गेले. काहींकडे मोजकीच शेतजमीन आहे. त्यामुळे कसाबसा आपला उदरनिर्वाह करतात.

या गावाच्या चारही बाजूने वाईल्ड लाईफ आहे. जंगलाने हा गाव वेढलेला आहे. एकीकडे जांभळीकडे जंगलातून जाणारी पायवाट आहे. तर दुसरीकडे, कोसमतोंडीला जाणारा एकमेव रस्ता. पण, वाईल्ड लाईफच्या कोअर झोनमध्ये हे गाव येते. त्यामुळे रस्ता दुरुस्तीसाठी नागझिरा व्याघ्र प्रकल्प अडचण ठरत असल्याचे गावातील आदिवासी सांगतात. वाईल्ड लाईफने जंगली प्राण्यांना जंगलात ठेवण्यासाठी योग्य ती उपाययोजना करावी, अशी मागणी स्थानिकांनी केली आहे. डोंगराच्या पलीकडे असलेल्या पिटेझरीचा विकास झाला. पण, डोंगराच्या अलीकडे असलेले थाटेझरीचे आदिवासी नरकयातना भोगत जीवन काढत आहेत.



### कोसमतोंडी-थाटेझरी रस्त्याची चाळण

**कोसमतोंडीवरून दोन किलोमीटर अंतरावर थाटेझरी हे गाव आहे. ना शिक्षण ना आरोग्याची सुविधा. या गावात जाण्यासाठी धड रस्ता नाही. या गावात जाण्यासाठी चांगला रस्ता व्हावा, असे स्थानिकांना वाटते. गाव तिथे रस्ता असे शासनाचे धोरण आहे. पण, हे गाव नागझिऱ्याच्या कोअर झोनमध्ये येत असल्याने रस्ता दुरुस्तीसाठी व्याघ्र प्रकल्पाकडून परवानगी मिळत नसल्याची ओरड आहे.**

### शेतीसाठी जंगली प्राणी खलनायक

**गावाला लागून अर्ध्या भागात जंगल आहे. दुसऱ्या अर्ध्या भागात शेती आहे. आता धान कापणीची वेळ आली आहे. परंतु, वन्यप्राणी हातातोंडाशी आलेला घास हिरावून घेतात. पिकांचे नुकसान करतात. ते कमी करण्यासाठी काही आदिवासी साड्या लावून जंगली प्राणी शेतात येणार नाही, यासाठी प्रयत्न करतात. काही आदिवासींनी शेतात मारे तयार केले. या माऱ्यावर जागून वन्यप्राण्यांना जंगलाचा रस्ता दाखविला जातो. शेतीसाठी जंगली प्राणी हे खलनायक ठरत असल्याची प्रतिक्रिया श्री मडावी यांनी दिली.**

# वन संवर्धनातून पर्यटनाच्या रूपाने अर्थव्यवस्था मजबूत करा: टि. एच. ढमढेरे



**सालेकसाः–** झाडांची अनियंत्रित तोड, अतिक्रमण, जंगलातील आगी आणि मानवी स्वार्थ यामुळे निसर्ग रडत आहे. जर आपण आपल्या वनसंपदेचं जतन केलं, तरआपल्या भागात वन पर्यटन केंद्रे, होम स्टे व्यवसाय, स्थानिक हस्तकला विक्री, आणि मार्गदर्शन सेवा यासारख्या अनेक रोजगाराच्या संधी निर्माण होऊ शकतात. यामुळे ग्रामस्थांचे उत्पन वाढेल आणि आपल्या अर्थव्यवस्थेला स्थैर्य प्राप्त होईल. मात्र, आपण जर या वनांचे योग्य संवर्धन केले, तर हेच वन पर्यटन विकासाचे केंद्रबिंदू बनू शकतात.

वन पर्यटन म्हणजे निसर्गाशी सुसंवाद साधण्याचा एक सुंदर मार्ग, जंगल सफारी, ट्रेकिंग, वॉटरफॉल साइट्स, वन्यजीव अभयारण्ये, पर्यावरण शिक्षण केंद्रे यासर्व गोष्टी ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था वाढवू शकतात, स्थानिकांना रोजगार देऊ शकतात, आणि आपल्या देशाची निसर्गसंपन ओळख जगासमोर उभी करू शकतात याचे उत्तम उदाहरण म्हणजे हाजराफॉल असे प्रतिपादन सामाजिक वनीकरण विभागाचे विभागीय वन अधिकारी टि. एच. ढमढेरे यांनी केले. ते यावेळी संयुक्त वन व्यवस्थापन समिती नवाटोला हाजराफॉल चा ११ वा वर्धापन दिन कार्यक्रमाप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

संयुक्त वन व्यवस्थापन समिती नवाटोला (हाजराफॉल) चा ११ वा वर्धापन दिन कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात हाजराफॉल परिसरात वृक्षारोपण करून करण्यात आली. जल जंगल जमीनचे रक्षण करणारे धरती आबा बिरसा मुंडा व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पूजा अर्चना करून करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागीय वन अधिकारी टि.एच. ढमढेरे होते. प्रमुख अतिथी म्हणून प्रभारी वनपरिक्षेत्र अधिकारी अभिलाषा सोनटक्के, वन व्यवस्थापन समिती नवाटोलाचे अध्यक्ष मरस्कोल्हे, उपाध्यक्ष पवन ऊईके, ग्रामपंचायत कोसमतर्राचे सरपंच सिंधुताई घरत, उपसरपंच सुलेलाल मडावी, पत्रकार पवन पाथोडे, क्षेत्र सहाय्यक बी.ए. कोहरे, जे. जे. खान, एस. एम. पवार, चौव्हाण, नंदेश्वर, बनोठे, सर्व समितीचे सदस्य व गावकरी, प्रामुख्याने उपस्थित होते.

समितीच्या स्थापनेपासून ते वर्तमान स्थिती पर्यंत समितीचे कार्य विषयी सविस्तर माहिती समितीचे अध्यक्ष मरस्कोल्हे यांनी प्रस्ताविकेच्या माध्यमातून मांडली. कार्यक्रमाचे औचित्य साधून पत्रकार पवन पाथोडे, सरपंच सिंधुताई घरत व समितीचे माजी सचिव वनरक्षक सुरेश राहांगडाले यांनी आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन वनरक्षक किशोर फुंडे तर आभार प्रदर्शन संयुक्त वन व्यवस्थापन समितीचे सचिव एस. के. बागडे यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी समितीचे अध्यक्ष गोविंद मरस्कोल्हे, उपाध्यक्ष पवन ऊईके, सचिव सतीश बागडे, प्रमोदकुमेटी, नरेंद्र मडावी, ममता कोडवती, लक्ष्मी मसराम, महेश वरखडे, संजय चौधरी, रवी मरस्कोल्हे, रोशन मडावी, दीपक चौधरी, निलेश चौधरी, विजय मलये, रवींद्र फुफुंडे, कृष्णा मडावी, रेवलजी उईके, राजेंद्र फरदे, वरखडे वरखडे, रेवल उईके आदींनी विशेष परिसर घेतले.